RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१६८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि.२९ जुलै २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## भाजपामध्ये एकच व्यक्ती पंतप्रधान बनण्याचे स्वप्न पाहू शकतो; राहुल गांधींचे पीएम मोदींवर टीकास्त्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ नवी दिल्ली**

केंद्रातील मोदी सरकार ३.० ने संसदेत आपला अर्थसंकल्प सादर केल्यानंतर अनेक विरोधी नेत्यांनी यावर टीका केली. दरम्यान, आज(२९ जुलै) लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शेतकरी, पेपरफुटी, देशात पसरलेली भीती, अर्थसंकल्प आणि कर या मुद्द्यांवरून मोदी सरकारला धारेवर धरले. यावेळी बोलताना राहुल म्हणाले की, 'देशात सध्या भीतीचे वातावरण आहे, ही भीती संपूर्ण देशात पसरली आहे. भाजपमधील लोक आणि मंत्रीही घाबरले आहेत,' असे म्हणत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर (छीशपवीर चेवळ) निशाणा साधला.

'गेल्या वेळी मी काही धार्मिक बाबींवर भाष्य केले होते. मी महादेवाच्या अहिंसेबद्दल, त्रिशूळाबद्दल भाष्य केले होते. आपल्या देशातील सर्व धर्म अहिंसेची भाषा बोलतात. घाबरू नका आणि कुणाला घाबरवू नका, असे मी म्हणालो होतो. पण, सध्या देशात भीतीचे वातावरण पसरले आहे. माझे मित्र (भाजप खासदार) हसत आहेत, पण मनातून तेदेखील घाबरले आहेत. भाजपची अडचण ही आहे की, त्यांच्या पक्षात फक्त एकच व्यक्ती पंतप्रधान होण्याचे स्वप्न पाहू शकतो. उद्या संरक्षणमंत्र्यांच्या मनात पंतप्रधान बनण्याचा विचार आला, तर मोठी समस्या निर्माण होईल,' अशी बोचरी टीका राहुल गांधी यांनी पीएम मोदींवर नाव न घेता केली.



ते पुढे म्हणतात, 'ही भीती इतक्या वेगाने का पसरत आहे, हा प्रश्न मी स्वतःलाही विचारला. भाजपमधील माझे मित्र, मंत्री, देशातील शेतकरी, कामगार आणि तरुण घाबरले आहेत. मी त्यावर खूप विचार केला. हजारो वर्षांपूर्वी हरियाणातील कुरुक्षेत्र येथे चक्रव्यूहमध्ये अभिमन्यूची सहा जणांनी हत्या केली होती. संशोधन केल्यानंतर मला कळले की, चक्रव्यूहचे दुसरे नाव पद्मव्यूह आहे, जे कमळाच्या आकाराचे असते. चक्रव्यूह हा कमळाच्या फुलाच्या आकारात असतो. २१व्या शतकात नवे चक्रव्यूह निर्माण झाले आहे, ज्याचे प्रतीक पंतप्रधान मोदी छातीवर घेऊन फिरतात. ज्या प्रकारे अभिमन्यू चक्रव्यूहात अडकला होता, तसाच प्रकार भारत चक्रव्हूहात अडकला आहे. द्रोणाचार्य, कर्ण, कृपाचार्य, कृतवर्मा, अश्वत्थामा आणि शकुनी यांनी अभिमन्यूला घेरुन मारले होते. आजच्या चक्रव्हूहात नरेंद्र मोदी, अमित शहा, मोहन भागवत, अजित डोवाल, अंबानी आणि अदानी आहेत.'

कोविडच्या काळात सरकारने छोटे उद्योग उद्ध्वस्त केले, त्यामुळे बेरोजगारी वाढली. आता अर्थमंत्री तरुणांसाठी इंटर्नशिप प्रोग्रामबद्दल बोललात. हा बहुधा विनोद असावा. भारतातील ५०० कंपन्या या प्रोग्राममध्ये सामील असल्याचे तुम्ही सांगितले. आधी तुम्ही पाय मोडला आणि आता तुम्हीच त्यावर मलमपट्टी करण्याचा प्रयत्न करत आहात. परीक्षेचा पेपर फुटणे हा आजच्या तरुणांचा मुख्य प्रश्न आहे. एका बाजूला पेपर फुटीचे चक्रव्यूह, तर दुसरीकडे बेरोजगारीचे चक्रव्यूह आहे. दहा वर्षांत ७० वेळा पेपर फुटले, तरुणांना अग्निवीरच्या चक्रव्यूहात अडकवले. या अर्थसंकल्पात अग्निवीर जवानांच्या पेन्शनसाठी एक रुपयाही नाही. तुम्ही शेतकऱ्यांना एमएसपीचा अधिकार देत नाही,' अशी टीकाही त्यांनी केली.

## देशमुखांचा तीन तासांत पर्दाफाश करण्यासाठी भाजपा सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ मुंबई**

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी माझ्याकडे समित कदम नावाच्या व्यक्तीला पाठवून उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, अजित पवार यांना अडकवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप अनिल देशमुख यांनी केला. खोटे आरोप करण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी दबाव टाकल्याचे अनिल देशमुख यांनी म्हटलं. अनिल देशमुख यांच्या आरोपानंतर भाजपने प्रत्युत्तर दिलं आहे. भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी अनिल देशमुख यांना पुरावे सादर करण्याचे आव्हान दिलं आहे.



शरद पवार गटाचे आमदार अनिल देशमुख यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले. तीन वर्षापूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी माझ्याकडे समित कदम या व्यक्तीला ५-६ वेळा पाठवलं होतं. उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, अजित पवारांवर मी खोटे आरोप करायचे. त्या खोट्या आरोपांचे प्रतिज्ञापत्र द्यायचं असं मला त्याने सांगितले. समित कदम आणि देवेंद्र फडणवीसांचे अतिशय घरगुती संबंध आहेत. समित कदम हा साधा नगरसेवकही नाही तरी फडणवीसांनी त्याला वाय दर्जाची सुरक्षा दिली आहे, असं अनिल देशमुख म्हणाले.फोटोला फोटोने उत्तर आम्हालाही देता येते अनिलबाबूयात कसला आला पराक्रम? एकदा तुम्ही पुरावे द्या त्यानंतरच्या तीन तासांत तुमचा पर्दाफाश करण्यासाठी आमचे पुरावे सज्ज आहेत, असं चित्रा वाघ म्हणाल्या.

## अमित शाहांनी वडिलांना शब्द दिला पण...; अभिजीत अडसूळांची नाराजी, महायुतीत बिनसलं?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ मुंबई**

गेल्या २ वर्षापासून देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्र्यांनी आम्हाला राज्यपालपदाचा शब्द दिला होता. शिवसेनेसाठी १ राज्यपालपद मिळणार होतं, ते अडसूळांना देऊ असं सांगितले होते. तशी चर्चाही अमित शाहांसोबत झाली होती. अमरावतीची जागा सोडण्यासाठी आम्हाला शब्द दिला होता मात्र तो पूर्ण झाला नाही त्यामुळे अडसूळ कुटुंबीय नाराज असल्याचं पुढे आले आहे. अभिजीत अडसूळ यांनी याबाबत भाजपाकडून आमच्यावर अन्याय होतोय अशी खंतही व्यक्त केली.



अभिजीत अडसूळ म्हणाले की, २७ मार्चला अमित शाहांसोबत झालेल्या बैठकीत आनंदराव अडसूळांना राज्यपाल बनवणार आहोत त्याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना त्याच दिवशी शिफारस पत्र पाठवा अशी सूचना केली. दोघांनी सह्या करून ते पत्र अमित शाहांना पाठवले. त्यानंतर नीती आयोगाच्या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्लीत गेले होते. तेव्हाही आणखी एक पत्र शाहांना पाठवले. मात्र दुसऱ्या दिवशी जी यादी आली त्यात नाव नव्हतं असा आरोप त्यांनी केला.तसेच राज्यपालपद न मिळाल्याने वडिलांनी खंत व्यक्त केली. प्रविण दरेकर हे मुंबई बँकेवर संचालक आहेत ते संचालकही होऊ शकले नसते. तुझ्यावरती अन्याय झाला परंतु मला त्या निवडणुकीत माघार घ्यायला लावली. अभिजीतला माघार घ्यायला लावत असाल तर त्याला कॉप करून घ्या असं फडणवीसांना सांगितले होते. गेली अडीच वर्ष शब्द दिला तरी तो पाळला नाही. मुख्यमंत्र्यांनी तिनदा सांगितले तरी ते अजून झाले नाही. मी कुणाकडे भीक मागितली नाही. लोकसभेत माघार घेतली, मुंबई बँक निवडणुकीत माघार घेतली अशी आठवणही अभिजीत अडसूळांनी सांगितली. माध्यमांशी बोलताना अभिजीत अडसूळांनी हा प्रकार सांगितला.

दरम्यान, प्रत्येकवेळी केराची टोपली दाखवली. २ वर्ष आम्ही थांबलो, प्रविण दरेकरसारखे पदाधिकारी ऐकत नसतील तर अमित शाह ऐकतील का असं वडील म्हणाले, जी परिस्थिती आहे ती आम्ही समोर मांडली. महायुतीत हे चुकीचे होतंय, अन्याय झाल्याची भावना आमच्या कार्यकर्त्यांच्या मनात आहे. प्रत्येकवेळी बलिदान द्यायचं आणि शांत राहायचं असं नाही. एकनाथ शिंदे यांनी आमच्यावर विश्वास ठेवला, आम्ही त्यांच्या प्रेमापोटी टिकून आहोत. शिवसेना-भाजपा युती म्हणून आम्ही एकत्रित आहोत. आमच्यावर देवेंद्र फडणवीस प्रेम करतात मग आम्हाला मागे का ठेवले जाते असा प्रश्न पडतो असंही अभिजीत अडसूळ यांनी म्हटलं.

## महायुतीमधील जागा वाटपाचा तिढा वाढणार महादेव जानकर यांनी केली ५० जागांची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मुंबई**

दोन महिन्यांवर आलेल्या विधानसभा निवडणुकीसाठीचं जागावाटप राज्यातील सत्ताधारी महायुती आणि विरोधी पक्षातील महाविकास आघाडीसाठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे. त्यात सत्ताधारी महायुतीमध्ये शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांनी अधिकाधिक जागांची मागणी करत महायुतीमधील प्रमुख पक्ष असलेल्या भाजपाचं टेन्शन वाढवलं आहेत. त्यात आता महायुतीमधील छोट्या पण प्रमुख पक्षांपैकी एक असलेल्या महादेव जानकर यांच्या राष्ट्रीय समाज पक्षाने ५० जागांची मागणी केली आहे. महादेव जानकर यांच्या या मागणीमुळे आधीच जागावाटपावरून पेचप्रसंग निर्माण झालेल्या महायुतीमधील तिढा आणखीनच वाढण्याची शक्यता आहे.

विधानसभा निवडणुकीबाबत प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना महादेव जानकर यांनी सांगितलं की, आमच्याकडून विधानसभेच्या २८८ जागांवर तयारी सुरू आहे. कुठल्याही पक्षासोबत आपण युती करतो, तेव्हा विद्यमान आमदाराला पर्याय आपल्याला तयार ठेवावा लागतो. त्या दृष्टीने आम्ही २८८ जागांवर तयारी करत आहोत. काही ठिकाणी त्याचा आमच्या मित्र पक्षांना फायदा होईल. तर काही ठिकाणी मित्रपक्षांचा आम्हाला फायदा होईल. त्यादृष्टीने आम्ही राज्यातील २८८ विधानसभा आणि विदर्भातील ६२ मतदारसंघात मेळावे घेत आहोत. तसेच २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय समाज पक्षाचा २०वा वर्धापन दिन हा अकोला येथे ठेवण्यात आला आहे. या मेळाव्याला ५० हजार लोक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

## तुम्हाला अपात्र का ठरवू नये?, अजित पवार गटाला सरन्यायाधीशांचा सवाल; नोटीस बजावत मागितलं उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्रता सुनावणी प्रकरणात आज महत्त्वाची घडामोड घडली आहे. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी अजित पवार गटाला विचारलेला प्रश्न चर्चेत आला आहे. तुम्हाला अपात्र का ठरवू नये? असा सवाल चंद्रचूड यांनी केला आहे. ॲड. सिद्धार्थ शिंदे यांनी ही माहिती दिली.

आज राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्रता प्रकरणावर सुनावणी होती. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात फूट पडल्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं आहे. आज अजित पवार गटाला ही विचारणा करण्यात आली की तुम्हाला अपात्र का ठरवलं जाऊ नये? सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी हा सवाल केला. अशी माहिती शिंदे यांनी दिली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी राहुल नार्वेकर यांच्या समोर झाली त्याचा निर्णय त्यांनी फेब्रुवारी महिन्यात दिला. त्यांच्या वतीने अनिल पाटील हे मुंबई उच्च न्यायालयात गेले. तर शरद पवार यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. आज या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयने नोटीस जारी केली आहे. अजित पवार आणि ४१ आमदारांना ही नोटीस बजावली आहे. तसंच ही विचारणा करण्यात आली आहे की तुम्हाला अपात्र का करण्यात येऊ नये? चार आठवड्यात या नोटिशीला उत्तर द्यायचं आहे. ही मुदत त्यांना देण्यात आली आहे. शिवसेनेचं जे आमदार अपात्रता प्रकरण आहे त्याबरोबरच हे प्रकरण घेतलं जाईल असंही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या आमदार अपात्रता प्रकरणांची सुनावणी एकापाठोपाठ घेतली जाईल असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी ३ सप्टेंबरला होणार आहे. त्यामुळे ३ सप्टेंबरलाच हे मॅटर ऐकलं जाईल अशी चिन्हं आहेत. तोपर्यंत अजित पवार गटाने उत्तर द्यायचं आहे असंही सिद्धार्थ शिंदे यांनी सांगितलं.

## जेईई मेन्स परीक्षेत एकाच विद्यार्थ्याला वेगवेगळे गुण, 'एनटीए'ला उच्च न्यायालयाची नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ नागपूर**

स्पर्धा परीक्षांमध्ये घोळाबाबत देशभरात नाराजीचे सूर उमटत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये प्रचंड रोष बघायला मिळत आहे. यात नॅशनल टेस्टिंग एजेन्सी (एनटीए) मार्फत घेतल्या जाणाऱ्या जेईई मेन्स परीक्षेत नवा घोळ झाल्याचे समोर आले आहे. जेईई मेन्स परीक्षेत एकाच विद्यार्थ्याला वेगवेगळे गुण दिल्याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने एनटीए ला जबाब देण्याचे आदेश दिले. ७ ऑगस्टपर्यंत एनटीएला उच्च न्यायालयात बाजू मांडायची आहे. तन्मय विनोद पाटील या विद्यार्थ्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याबाबत याचिका दाखल केली. विद्यार्थ्याने याचिकेत आरोप केला आहे की त्याने यंदा दिलेल्या जेईई मेन्स परीक्षेत एनटीएकडून घोळ करण्यात आला. परीक्षेत त्याला एमआर-१७००५७५९ हा रोल नंबर दिला गेला. परीक्षा झाल्यावर या रोल नंबरवर गुण तपासले असता तन्मयला ८९.८२ पर्सेंटाईल मिळाल्याचे दाखविण्यात आले. मात्र याच रोल नंबरचा वापर करून दुसऱ्यांदा गुण तपासल्यावर विद्यार्थ्याला २९.८२ पर्सेंटाईल दाखविण्यात आले.

## 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वात अमरावतीकर आर्या जाधवची दमदार एन्ट्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

'एमटीव्ही' या वाहिनीवरील 'हॅसल-२' या कार्यक्रमात रॅप प्रकारातील गायनातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारी अमरावतीकर आर्या जाधव ही आता 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वातील स्पर्धक म्हणून समोर आली आहे. तिच्या या कामगिरीबद्दल अमरावतीकरांनी आनंद व्यक्त केला आहे.

आर्या जाधव ही येथील उद्योजक हेमंत जाधव यांची कन्या आहे. कॅम्प परिसरात वास्तव्याला असलेल्या आर्या जाधव हिला गायनाची आवड आहे. 'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या पर्वाला रविवारपासून सुरूवात झाली.

या कार्यक्रमाचा सूत्रसंचालक म्हणून अभिनेता रितेश देशमुख जबाबदारी सांभाळत आहे. आर्या जाधव हिच्यासह वर्षा उसगांवकर,



कोकण हार्टेड गर्ल, निखिल दामले, पंढरीनाथ कांबळे, योगिता चव्हाण, जान्हवी किल्लेकर, अभिजीत सावंत, घन:श्याम दरवडे, इरिना रूडाकोवा, निकी तांबोळी, अरबाज पटेल, वैभव चव्हाण, धनंजय पोवार, पुरुषोत्तमदादा पाटील, सूरज चव्हाण या स्पर्धकांनी बिग बॉसच्या घरात प्रवेश घेतला आहे.

याआधी 'एमटीव्ही' या वाहिनीवरील 'हॅसल-२' या कार्यक्रमातील कामगिरीतून आर्या जाधव हिने प्रेक्षकांची मने जिंकली. रॅप हा गायन प्रकार तिने सादर केला होता. नऊवारी साडी परिधान करून आर्याने केलेले सादरीकरण अनेकांना भावले होते. करोना काळात घरी असताना आर्याला एक दिवस रॅप लिहिण्याची कल्पना सुचली. त्यानंतर घराच्या छतावर बसून आर्याने रॅप लिहायला सुरूवात केली.

आर्या जाधव हिने 'रॅपर गर्ल' म्हणून ओळख मिळवली आहे. आर्याने रितेश देशमुखसाठी खास रॅप लिहून तो मंचावर सादर करून दाखवला. 'कलर्स मराठी'वर आता प्रेक्षकांना रोज रात्री ९ वाजता 'बिग बॉस मराठी' पाहता येणार आहे.'बिग बॉस मराठी-३' चा विजेता शिव ठाकरे देखील अमरावतीचा आहे. त्याने हिंदी बिग बॉसही गाजवले होते. त्यामुळे आर्या जाधव हिच्या कामगिरीकडे अमरावतीकरांचे लक्ष लागले आहे.

## संपादकीय ......

# पहिल्या आठवड्यात विरोधकांचा वरचष्मा

*संसदेचे पावसाळी अधिवेशन २२ जुलै रोजी सुरू झाले आणि २३ जुलै रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केंद्र सरकारच्या तिसर्या कार्यकाळातील पहिला अर्थसंकल्प सादर केला. संसदेचे हे अधिवेशन गेल्या दहा वर्षांच्या तुलनेत पूर्णपणे वेगळे होते. गेल्या १० वर्षांत सत्ताधार्यांसमोर विरोधक कमकुवत होते; मात्र यावेळी सभागृहातील विरोधकांच्या वृत्ती आणि कार्यशैलीमुळे सरकारची रणनीती प्रत्येक टप्प्यावर अयशस्वी ठरली. विरोधकांची आक्रमक वृत्ती पाहून सत्ताधारी पक्षातील घटक पक्ष गप्प बसल्याचे अनेक प्रसंग आले. विरोधी पक्षनेते राहुल गांधी, अखिलेश यादव यांनीही सरकारवर हल्लाबोल केला.*

*संसदेत अधिवेशनात प्रश्नोत्तराचा तास, शून्य प्रहर आणि अर्थसंकल्पावर चर्चा झाली. यात विरोधकांचा वरचष्मा होता. महागाई, अग्निवीर, नीट, बेरोजगारी, शेती अशा अनेक प्रमुख मुद्द्यांवरून लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांत सरकारला कोंडीत पकडण्यात विरोधकांना यश आले. विरोधकांकडून राज्यसभेत काँग्रेसचे जयराम रमेश, रणदीप सुरजेवाला, आम आदमी पक्षाचे संजय सिंह आणि राघव चड्ढा, सपाचे रामजी लाल सुमन आणि तृणमूल काँग्रेसचे साकेत गोखले आणि इतर खासदारांनी सरकारवर हल्लाबोल केला. विरोधकांची एकजूट सत्ताधारी पक्षाला डोकेदुखी ठरत आहे. त्याचवेळी सरकारच्या मित्रपक्षांनी विरोधकांप्रमाणे आक्रमकता दाखवण्यात कमी रस दाखवला. सरकारकडून कोणत्याही विरोधी पक्षावर हल्ला होत असताना इंडिया आघाडीतील पक्षांनी एकजूट दाखवत पलटवार केला.सरकारला अनेक मुद्द्यांवर राजकीयदृष्ट्या बॅकफूटवर नेण्यात काँग्रेसला यश आले आहे. शेतकर्यांच्या प्रश्नांवरून विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारवर असाच राजकीय हल्लाबोल केला. राहुल गांधी यांनी शेतकर्यांच्या शिष्टमंडळाला संसदेत भेटायला बोलावले. राहुल गांधी हवे असते तर ते या शिष्टमंडळाला घरीही भेटू शकले असते; मात्र या भेटीचा राजकीय फायदा घेण्यासाठी राहुल गांधी यांनी शिष्टमंडळाला संसद भवनातील आपल्या कार्यालयात बोलावले. विरोधी पक्षनेत्याच्या या रणनीतीमुळे सरकारमधील अस्वस्थता वाढली. या शिष्टमंडळाला भेटू नये म्हणून संसद पास प्रक्रियेत कडकपणा दाखवण्यात आला. राहुल गांधींनाही तेच हवे होते. त्यांनी सरकारवर शिष्टमंडळाला संसदेत प्रवेश करण्यापासून रोखल्याचा आरोप केला. राहुल गांधींनी हा मुद्दा इतका वाढवला की, सरकारला मागे हटावे लागले. त्यानंतर शेतकरी नेत्यांच्या शिष्टमंडळाला संसदेत जाऊन राहुल गांधींना भेटण्यासाठी पास देण्यात आला. बैठकीनंतर राहुल गांधींनीही शेतकरी हित या भेटीचे भांडवल करण्याचा प्रयत्न केला. तसेच शिष्टमंडळाच्या मागण्यांसाठी शासनावर दबाव टाकण्याचे आश्वासन देऊन त्यांनी शेतकर्यांना संदेश दिला. यानंतर राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान किमान आधारभूत किमतीबाबत विचारलेल्या प्रश्नांवर विरोधकांनी सरकारला कोंडीत पकडले. या मुद्द्यावरून विरोधकांनी एकजूट दाखवत सरकार शेतकरीविरोधी असल्याचा आरोप केला.*

*या अधिवेशनात विरोधकांनी सत्ताधार्यांच्या चुकांचे भांडवल केले. अर्थसंकल्पात आंध्र प्रदेश आणि बिहारला अधिक महत्त्व देण्यात आले. उर्वरित राज्यांबाबत केंद्र सरकारच्या उदासीन वृत्तीने विरोधकांना हल्लाबोल करण्याची संधी दिली. या संधीचा विरोधकांनी पुरेपूर फायदा घेतला. अर्थसंकल्पावरून विरोधकांनी सरकारला धारेवर धरले. दबक्या आवाजात सत्ताधारी पक्षाच्या मित्रपक्षांनीही विरोधकांना साथ दिली. यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. महाराष्ट्राचे शिवसेनेचे शिंदे गटाचे खासदार अर्थसंकल्पावेळी वही-पेन घेऊन बसले होते, जेणेकरून महाराष्ट्रासाठी केलेल्या घोषणांची नोंद घेता येईल; मात्र अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या तोंडून अर्थसंकल्पात महाराष्ट्राचे नाव एकदाही आले नाही. यानंतर शिवसेनेच्या शिंदे गटाच्या खासदारांना वही आणि पेन बंद करून ठेवण्यास भाग पाडले. अर्थसंकल्प संपल्यानंतर महाराष्ट्रासाठी प्रश्नांची उत्तरे द्यावी लागू नयेत म्हणून या खासदारांनी माध्यमांपासून अंतर ठेवले.*

*सरकारला कोंडीत पकडण्याबरोबरच विधानसभा निवडणुकीवर डोळा ठेवून संसदेतून राजकीय संदेश देण्याची खेळीही विरोधकांनी खेळली. त्यासाठी अर्थसंकल्पीय भाषणात कुमारी शैलजा आणि प्रणिती शिंदे यांच्यासह काँग्रेसने पक्षात नवी पिढी निर्माण करण्यासाठी आणि महिला, तरुण आणि दलित व्होट बँकेला टॅप करण्यासाठी खेळी केली. सरकारला या खेळीवर प्रतिक्रिया देण्याचा कोणताही मार्ग सापडला नाही किंवा उलट सरकारला याचा विचारही करता आला नाही. येथेही विरोधकांचा विजय झाला. भाजप खासदार अभिजित गंगोपाध्याय यांच्या वक्तव्यावर संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनाही सभागृहात खेद व्यक्त करावा लागला. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनाही संसदेच्या अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात अनेक वेळा विरोधकांच्या कठोर टीकेला सामोरे जावे लागले.*

# मत्स्य व्यवसायाला मत्स्य शेतीचा दर्जा मिळणार

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक–** राज्याला ७२० किलोमीटर लांबीचा सागरी किनारा असून सात सागरी जिल्ह्यांचा समावेश यात आहे; मत्स्यव्यवसाय हा राज्यात रोजगार निर्मितीस अनुकूल व अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. यासाठी मत्स्य व्यवसायाला मत्स्य शेतीचा दर्जा देण्यापासून, या विभागासाठी खास धोरण समिती गठित करण्यासारखे विविध महत्त्वाचे निर्णय या सरकारने घेतले आहेत.यामागे केवळ राज्यातील मत्स्य व्यवसायाला बळ देणे आणि संपूर्ण देशात महाराष्ट्राचे मत्स्यधोरण अव्वल असावे हीच भूमिका असल्याचे प्रतिपादन राज्याचे मत्स्य व्यवसाय, वने व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.




मंगळवारी (दि. २३ जुलै २०२४) सायंकाळी सह्याद्री राज्य अतिथीगृहात राज्याच्या मत्स्यव्यवसाय धोरण समितीची पहिली बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. धोरण समितीचे अध्यक्ष राम नाईक उपस्थित होते.राज्याच्या मत्स्य व्यवसाय क्षमतेच्या केवळ १५ टक्के क्षमतेचाच आज वापर होत असून, क्षमतेचा पूर्ण वापर झाला तर राज्य या क्षेत्रात देशात अव्वल ठरेल, असा विश्वास व्यक्त करत मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले की, ही क्षमता पूर्ण वापरण्याकरता राज्याचे सर्वंकष मत्स्यव्यवसाय धोरण असणे आवश्यक आहे.

गोड्या पाण्यातील मासेमारी, भूजल मत्स्यमालन हे मत्स्यव्यवसाय मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करू शकतात. तसेच समाजातील मोठ्या घटकांना अन्न पुरवठा करू शकतात. त्यामुळेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने गोड्या पाण्यातील मासेमारीकरता विविध योजना जाहीर केल्या आहेत.

या योजनांचा संपूर्ण लाभ राज्याला घ्यायचा असेल, तर राज्याचे मत्स्यव्यवसाय धोरण लवकरात लवकर तयार केले पाहिजे, असेही मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी सांगितले. या विषयात जेथे अडचणी येतील तेथे केंद्र सरकारच्या मत्स्योद्योग विभागाची मदत घ्यावी, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली. सागरी किनारपट्टी वरील इतर राज्यांच्या मत्स्य व्यवसाय विषयक धोरणांचा तसेच इतर राज्यांच्या गोड्या पाण्यातील मासेमारी व भूजल मत्स्यपालन विषयक धोरणांचाही राज्याच्या मत्स्यव्यवसाय धोरण समितीने तौलनिक अभ्यास करावा आणि राज्याचे मत्स्य धोरण लवकरात लवकर तयार करावे, अशी सूचनाही श्री. मुनगंटीवार यांनी यावेळी केली.समितीचे अध्यक्ष श्री. नाईक म्हणाले की, राज्याचे नवीन मत्स्यव्यवसाय धोरण हे सर्वसमावेशक आणि सर्वंकष होईल. राज्यातील कुठल्याच भागावर आणि मत्स्य व्यवसायाशी संबंधित कुणावरही अन्याय होणार नाही, याची काळजी आपली समिती घेईल.

त्यासाठी या समितीच्या दर आठवड्याला बैठका घेऊन लवकरात लवकर धोरणाचा मसुदा तयार करून शासनाला सादर केला जाईल. केवळ आमदार, नेते आणि मच्छिमार संस्थाच नव्हे, तर जनसामान्यांकडूनही धोरणविषयक सूचनांचे स्वागत आहे, असे सांगून श्री. नाईक यांनी समितीला आपल्या सूचना लेखी पाठविण्याचे आवाहन यावेळी केले.या बैठकीत सर्व आमदारांनी व मच्छिमार प्रतिनिधींनी मच्छिमारांच्या विविध समस्या मांडल्या तसेच पायाभूत सुविधांविषयीच्या विविध मागण्या मांडल्या. या बैठकीत विविध विषयांवर चर्चा झाली. संभाव्य धोरणात या सर्व बाबींचा साकल्याने विचार करून योग्य धोरण आखू, असे या चर्चेअंती समितीचे अध्यक्ष राम नाईक यांनी सांगितले.

# विद्याभारती महाविद्यालयातील '२१ व्या शतकातील स्त्रीवादः सीमोल्लंघन करू या; भविष्य घडवूया' या विषयावरील परिषद संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती–** स्थानिक विद्याभारती महाविद्यालय कॅम्प, अमरावती येथे '२१ व्या शतकातील स्त्रीवाद सीमोलंघन करूया, भविष्य घडवूया' या विषयावर राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर अध्यक्ष म्हणून तर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे उद्घाटक होते. बीजभाषण महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवयित्री प्रा. नीरजा यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव डॉ. अशोक चव्हाण, कोषाध्यक्ष श्री. रघुनाथजी रोडे, आयक्युएसी समन्वयक डॉ. पी. जी. बनसोड, आणि परिषदेचे आयोजक सचिव डॉ. आर. एम. पाटील उपस्थित होते. यावेळी १४० अभ्यासक, संशोधक यांच्या शोधनिबंधाचे प्रोसिडिंग प्रकाशित करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी बोलतांना डॉ. असनारे सरांनी अत्यंत मौलिक शब्दांमध्ये आपल्या ओघवत्या वाणीने वादातही सुसंवाद असावा आणि आधुनिक काळात स्त्री सक्षम झाली पाहीजे असे प्रतिपादन करतांना त्यांनी स्त्री सक्षमीकरणावर विशेष भर दिला.



या परिषदेमध्ये बीजभाषण करतांना सुप्रसिद्ध कवयित्री प्रा. नीरजा यांनी गतकाळापासून तर आधुनिक काळापर्यंत स्त्रियांच्या स्थिती गतीचे वर्णन करताना रामायण, महाभारत आणि मनुस्मृती यांसारख्या प्राचीन ग्रंथापासून ते पाश्चात्य विचारवंताच्या सिद्धातांमधील अनेक दाखले दिले. त्यांनी आधुनिक काळाला स्त्रियांच्या आत्मशोधाचा काळ असे म्हटले आणि स्त्रीवादी चळवळीचे उद्दिष्ट भगिनी भाव निर्माण करणे असावे असे महत्वपूर्ण विधान केले. संत कवयित्री जनाबाई, बहिणाबाई, आणि परिवर्तनवादी विचारक म. ज्योतिबा फुले व र.धों. कर्वे यांच्या स्त्रीवादी चळवळीच्या कार्याचा उजाळा दिला. कवयित्री मल्लिका अमरशेख, रजनी परुळेकर, प्रज्ञा पवार, सुनिता झाडे, प्रभाताई गणोरकर यांच्या कवितेचे दाखले देत त्यांनी साहित्यातील स्त्रीवादी चळवळीचा गोषवारा मांडला. त्यांनी ताराबाई शिंदे यांच्या निबंधाचा उल्लेख करत पाश्चात्य काळापासून आधुनिक काळापर्यंत स्त्री जीवनाचे बदलते स्वरूप आणि स्त्री जीवन उलगडून दाखविले. परिषदेच्या प्रास्ताविकातून डॉ. आर. एम. पाटील यांनी आयोजनामागील भूमिका कथन करून स्त्रीवादी चळवळीची उलगडनी करून आजच्या स्थितीत या विषयावरील परिषदेची आवश्यकता व्यक्त केली.

अध्यक्षीय मनोगत करतांना महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. येनकर यांनी महाविद्यालयाच्या लौकिका संदर्भात माहिती देवून तसेच परिषदेच्या आयोजनामागील भूमिका व्यक्त करून स्त्रीवादी चळवळीच्या संदर्भात सुतोवाच केले. या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. मीनल खेरडे व डॉ. गजानन बनसोड यांनी केले तर आभार प्रा. अमित इंगोले यांनी मानले. पॅनल डिस्कशन या सत्रामध्ये डॉ. काशिनाथ बऱ्हाटे, डॉ. बी.एच. किर्दक, डॉ. सूरज शुक्ला, डॉ. शांताराम चव्हाण, डॉ. ओमप्रकाश बोबडे, डॉ. किशोर साबळे आणि प्रा. वनिता राऊत या तज्ञांनी परिषदेतील मुख्य विषयाच्या अनुषंगाने स्त्रीवादाच्या विविध पैलूंवर अभ्यासपूर्ण चर्चा घडवून मुक्तमंथन केले. या सत्राचे प्रास्ताविकातून दिशादिग्दर्शन डॉ. आर. एम. पाटील यांनी तर आभार डॉ. व्ही.पी. शेकोकार यांनी केले.




## भोपळ्याच्या बियांमुळे हृदय राहते निरोगी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ –** भोपळ्याच्या बिया आपल्या शरीरासाठी आवश्यक असलेल्या अनेक पोषक तत्त्वांनी समृद्ध असतात. ते खाल्ल्याने हृदय निरोगी राहते. तसेच सांधेदुखीपासून आराम मिळतो, केसांशी संबंधित समस्याही दूर होतात, असे तज्ज्ञ सांगतात. अशा अनेक फायद्यांनी त्याचे बीज भरलेले असते. चला जाणून घेऊया त्याबद्दल.

**हृदयाशी संबंधित समस्या दूर–** निरोगी राहण्यासाठी फळे आणि भाज्या आवश्यक आहेत; परंतु काही फळे आणि भाज्यांचे बियाणेदेखील आरोग्याच्या अनेक समस्यांवर उपचार आहेत.



सूर्यफूल, अलसी (जवस) आणि भोपळ्याचे लहान बियाणे दररोज खाल्ल्याने तुम्ही दीर्घकाळ निरोगी राहू शकता. तज्ज्ञांनी म्हटले आहे की, या बिया महिलांसाठी खूप फायदेशीर आहे कारण त्यात मॅग्नेशियम आणि जीवनसत्त्व 'के' असते, जे मासिक पाळीमध्ये मदत करते. भोपळ्याच्या बिया खाल्ल्याने हृदय निरोगी राहते कारण त्यात फायबर, निरोगी चरबी तसेच अटिऑक्सिडंट्स चांगल्या प्रमाणात असतात, जे कोलेस्टेरॉल काढून टाकण्यास प्रभावी असतात.

या बियांमध्ये असलेले मॅग्नेशियम रक्तदाबाची पातळी नियंत्रित करते, ज्यामुळे हृदयाशी संबंधित समस्या दूर राहतात. भोपळ्याच्या बिया खाल्ल्याने शरीराची प्रतिकारशक्तीही वाढते. या बियांमध्ये अँटिऑक्सिडंट्स आणि फायटोकेमिकल्सची उपस्थिती प्रतिकारशक्ती मजबूत करण्यास उपयुक्त ठरते. अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्मांनी समृद्ध असलेले त्याचे बियाणे सांधेदुखी कमी करण्यासाठीदेखील प्रभावी आहेत. संधिवाताच्या दुखण्यापासून आराम मिळवण्यासाठी त्याच्या बिया आहाराचा भाग बनवावा. भोपळ्याच्या बिया जीवनसत्त्व 'सी'चा चांगला स्रोत आहेत. याचे सेवन केल्याने केस मुळापासून मजबूत होतात आणि त्यांची वाढही वेगवान होते.

# मुसळधार पावसानंतर राज्यभरात पावसाचा जोर ओसरला!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती –** राज्यात मागच्य काही दिवासांपासून चांगला पाऊस पडत आहे. तर तीन दिवसांपूर्वी संपूर्ण राज्यामध्ये मुसळधार पावसाने हजेरी लावली होती. या पावसाने अनेक नद्यांना पूर आला असून पाझर तलाव आणि छोटी धरणे भरले आहेत. मोठ्या धरणांच्या पाणीसाठ्यात कमालीची वाढ झाल्यामुळे बळीराजा सुखावला आहे.

दरम्यान, अजूनही राज्यातील अनेक ठिकाणी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. तर हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्याची माहिती आहे. तीन दिवसांपूर्वी पश्चिम घाटासह महाराष्ट्रात झालेल्या पावसानंतर राज्यातील पावसाचा जोर



ओसरला आहे. २५ जुलैनंतर राज्यात पावसाचे प्रमाण खूपच कमी झाल्याचे चित्र आहे.पुढील पाच दिवसांच्या पर्जन्यमानाचा विचार केला तर कोकण, पश्चिम घाट परिसर आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. २९ जुलै ते १ ऑगस्ट या काळामध्ये कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता कमीच आहे. संपूर्ण मराठवाड्यात अजूनही म्हणावा तितका पाऊस झाला नसल्याचं शेतकऱ्यांनी सांगितलं आहे. एकीकडे पुणे जिल्ह्यातील घाट परिसरात मुसळधार पाऊस पडत असून दुसरीकडे त्याच जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील पाझर तलावही भरले नसल्यामुळे पावसाचे असमान वितरण होत असल्याचं समोर येत आहे. दरम्यान,राज्यातील पेरण्या पूर्ण झाल्या असून पश्चिम घाटातील भात लागवड अजूनही बाकी आहे. राज्यातील बहुतांश शेतकर्यांनी एक रूपयांत पीक विमा या योजनेसाठी अर्ज भरला आहे.

# राज्य अधिस्वीकृती समितीने घेतले श्री अंबादेवी व श्री एकविरा देवीचे दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती–** राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष व सदस्यांनी विदर्भाची कुलदेवता असलेल्या श्री अंबादेवी व श्री एकविरा देवीचे दर्शन घेतले. श्री अंबादेवी संस्थानच्यावतीने समितीचे अध्यक्ष यदुनाथ जोशी आणि माहिती व जनसंपर्क विभागाचे संचालक (माहिती/प्रशासन) तथा समितीचे सदस्य सचिव हेमराज बागुल तसेच समितीच्या सर्व सदस्यांचा शाल, श्रीफळ व पुस्तक देऊन यावेळी सत्कार करण्यात आला.

अंबादेवी संस्थानच्या विश्वस्त श्रीमती दिपा खांडेकर, दैनिक हिंदुस्थानचे संपादक विलास मराठे व श्रीमती विद्या देशपांडे यांच्यासह अन्य विश्वस्त यांनी यावेळी सविस्तर माहिती दिली.अमरावतीचे



माहिती उपसंचालक अनिल आलुरकर व अन्य विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. सुरेखा मुळे, राजू पाटोदकर सुनील सोनटक्के, संप्रदा बिडकर आदी अधिकारी, अमरावती विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष रवींद्र लाखोडे, सदस्य गोपाल हरणे तसेच गिरीश शेरेकर जिल्हा माहिती अधिकारी अपर्णा यावलकर, सहाय्यक संचालक विजय राऊत आणि सहकारी अधिकारी यावेळी उपस्थित होते.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २९ जुलै २०२४ — शहर/ग्रामिण


# शहरातील ऑटोचालकांची आजपासून तपासणी मोहिम

## परमीट, बेंच, बिल्ला, गणवेश तपासणार

## नियम तोडणाऱ्यांवर ऑन द स्पॉट कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती –** शहर वाहतुक शाखा पश्चिम विभागाच्या प्रमुख पीआय रिता उईक आज सोमवार २९ जुलैपासून वाहतुक पोलिसांसह शहरातील ऑटोचालकांची तपासणीची विशेष मोहिम सुरू करणार आहे. या मोहिमेदरम्यान ऑटोचालकांचे परटीम, बॅच, बिल्ला, गणवेश व कागदपत्रांची कसून तपासणी होणार आहे. तसेच नियम तोडणाऱ्या ऑटोचालकांविरोधात ऑन द स्पॉट कारवाई होणार आहे.



विशेष म्हणजे, कोणत्याही चौकात अर्धा रस्ता व्यापून ऑटो उभा करणे, ही प्रथा देखील पोलिस कायमची बंद करणार आहे.शहरात बहुतांश ऑटोचालक मनमानी पध्दतीने बेशिस्त वागतात. चौकात तेही टर्निंगवर अर्धा रस्ता व्यापून प्रवाशांना गोळा करण्यासाठी ऑटो उभा करणे, वाटेत माणून सहजउभादेखील असलातरीमागेपुढे काहीच न पाहता मध्येच ऑटो थांबविणे, गणवेश न घालणे, बिल्ला न लावणे, कुठेही ऑटो पार्क करून मार्गावरील वाहतुक अडविणे, असे सर्रास प्रकार बहुतांश ऑटोवाले करतात. त्यामुळे वाहतुक शाखेच्या प्रमुख पीआय रिटा उईके यांनी आजपासून शहरात ऑटोचालकांच्या तपासणीची विशेष मोहिम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. पीआय रिटा उईके सोमवार २९ जुलैपासून ताफयासहऑनरोड होईल शहरातील सर्व ऑटो चालकांचे कागदपत्रे, बिल्ला, परमीट, गणवेश तपासणार आहे. तसेच नियम तोडणाऱ्या ऑटोचालकांवर ऑनदस्पॉट दंडात्मक किंवा गुन्हे दाखल करण्याची कारवाई करणार आहे. शाळकरी मुलांची वाहतुक करणाऱ्या ऑटोचालकांची सर्वच बाबतीत कसून तपासणी होणार आहे, हे विशेष.


### दारुड्या ऑटोचालकांवर वॉच

डफरिन, इर्विन, पीडीएमसीसह अमरावती-बडनेरा मार्गावर चालणारे काही ऑटोचालक हे नेहमी दारूच्या नशेत तर्रर, असतात. विद्यार्थ्यांना शाळेत सोडल्यानंतर काही ऑटोचालक वॉलकट कपाऊंटसह मुख्य बसस्थानक ते बडनेरा मार्गावर असलेल्या अनेक देशी दारूच्या दुकानात दिसतात. अशा ऑटोचालकांवर देखील वाहतुक पोलिसांना वॉच राहणार असून त्यांच्यावर ड्रंकन ड्राईव्हनुसार कारवाई पोलिस करणार आहे. तसेच त्यांचा परवाना रद्द करण्याचा प्रस्ताव सुध्दा आरटीओ कार्यालयाला पाठविणार आहे.

# आता सर्वसामान्य नागरिकांनाही अनुभवता येणार जंगलातील रात्र

## घनदाट जंगलाच्या बफर झोन मध्ये पर्यटकांसाठी ८ मचाण उभारले जाणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती–** निसर्ग प्रेमींना जंगलाबद्दल खूप क्रेझ असते. अनेकांना वाटते आपण जंगलात भ्रमंती करावी व रात्र झाली तर घनदाट जंगलात मुक्काम करावा,पण बुद्ध पौर्णिमेची प्राणी प्रगणना निमित्याने होणारा मुक्काम वगळता सर्व सामान्य व्यक्तीला जंगलात मुक्काम करायला मिळत नाही. आता मॅजिकल मेळघाटच्या माध्यमातून सर्व सामान्य व्यक्तीचे जंगलात मचाणावर मुक्काम करण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे.



वनविभाग व जिल्हाधिकारी यांच्या संयुक्त पुढाकाराने चिखलदऱ्याच्या घनदाट जंगलाच्या बफर झोन मध्ये पर्यटकांसाठी ८ मचाण उभारले जाणार आहे. केरळ राज्याच्या ट्री टॉपच्या धर्तीवर राज्यातील पहिला अभिनव प्रयोग मेळघाटात प्रत्यक्षात आकारास येत आहे. पर्यटकांना मचाणच्या माध्यमातून जंगलातील थ्रील अनुभवणे, निवांत क्षणी पक्षी, प्राणी, ओहोळ, झरा, कीटक, वनस्पतीची झुळूक अनुभवाला मिळणार आहे. रात्रीची निरव शांतता आणि सकाळी पक्ष्यांचा मंजुळ स्वर पर्यटकांच्या कानी पडणार आहे. विशेष म्हणजे पर्यटकांच्या सुरक्षितेची पूर्ण काळजी वनविभाग घेणार आहे. घराप्रमाणे एटॅच टॉयलेट बाथरूमची सुविधा उपलब्ध राहणार आहे.

विशेष म्हणजे तुम्हाला या ठिकाणी ने-आण करण्यासाठी पर्यटकांच्या दिमतीला जिप्सीची सुविधा राहणार असून तुमच्या सोबतीला या जंगला विषयी माहिति देणारा वाटाड्या अर्थात गाईड राहणार आहे. या मुक्काम दरम्यान पर्यटकांना मेळघाटातील अस्सल चुलीवरच्या जेवणाची मेजवानी मिळणार आहे. म्हणजे या पर्यटनाच्या माध्यमातून जिप्सी चालक, गाईड व एक सेवेकरी यांना रोजगार उपलब्ध होणार आहे.




यासाठी घरबसल्या मेळघाट वनविभागाच्या मॅजिकल मेळघाट वेबसाईटवर ऑनलाईन सुविधाद्वारा कोठूनही आपले बुकिंग करता येणार आहे.

मचाणवर मुक्काम झाल्यावर तुम्हाला पायदळ रपेट मारायची असल्यास वनविभागाचा कर्मचारी तुम्हाला या भागातील वनौषधी, पक्षी, प्राणी आदींची माहिती देणार आहे. या सोबतच आमझरी व भीमकुंड परिसरात स्काय सायकलिंग, स्विस टेंट, ह्युमन गायरो राईड ,क्लायबिंग वॉल आदी सारखे अनेक साहसी क्रीडा प्रकार अनुभवाला मिळणार आहे.

### पर्यटकांसाठी बनविण्यात आलेले सुसज्य मचाण सुरक्षेला प्राधान्य

सर्व सामान्य व्यक्तीचे जंगलात मचाणवर मुक्काम करण्याचे स्वप्न मेळघाट वनविभाग पूर्ण करणार असून यासाठी काही स्पॉट निश्चित करण्यात आले. प्रत्येक पर्यटकांच्या सुरक्षिततेची काळजी वनविभाग घेणार असून येत्या १५ ऑगस्ट नंतर हे काम पूर्णत्वास येणार असल्याचे मेळघाट वन्यजीव विभागाचे विभागीय वनाधिकारी यशवंत बहाळे यांनी सांगितले.

# पत्रकारितेच्या कर्तव्याचा सत्कार : सुरेश शुक्ल

## श्रमिक पत्रकार संघाचा जीवनगौरव पुरस्कार सोहळा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती –** आपल्या पत्रकारितेच्या कारर्किदीत आपण प्रामाणिकपणे समाजासाठी कार्य करण्याचा प्रयत्न केला आहे. उपेक्षितांना न्याय मिळवून देण्यासोबत पत्रकारितेची तत्व आयुष्यभर जपली आहेत. अमरावती श्रमिक पत्रकार संघाने आपणास जीवनगौरव पुरस्कार देऊन आपल्या कर्तव्याचा सत्कार केल्याचे भावनिक मत ज्येष्ठ पत्रकार सुरेश शुक्ल यांनी व्यक्त केले.

अमरावती श्रमिक पत्रकार संघातर्फे रविवारी (ता.२८) स्थानिक हॉटेल प्राईम पार्क येथे जीवनगौरव पुरस्कार सोहळ्याचे सत्कारमूर्ती म्हणून ते बोलत होते. अमरावती श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष गोपाल हरणे अध्यक्षस्थानी होते. यावेळी व्यासपीठावर राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष यदुनाथ जोशी, माहीती संचालक हेमराज बागुल, विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष रवींद्र लाखोडे, दै. प्रतिदिनचे संपादक नानक आहुजा उपस्थित होते. सत्कारमूर्ती सुरेश शुक्ल यांना अमरावती श्रमिक पत्रकार संघातर्फे पत्रकारिता जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह व २१ हजार रूपयाचा धनादेश देऊन त्यांना मान्यवरांचे हस्ते गौरविण्यात आले.

सत्काराला उत्तर देतांना सुरेश शुक्ल यांनी त्यांची कारर्कीद, पत्रकारितेतील जडण-घडण व सामाजिक पत्रकारिता यावर मत व्यक्त केले. विविध वर्तमानपत्रांमध्ये कार्य करीत असतांना आपणास अनेकांचे सहकार्य लाभले. इतरांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण आग्रही भूमिकेचे होतो. आज आपण पत्रकारितेत सक्रिय नसलो तरी पत्रकार म्हणून समाज व पत्रकारितेतील घडामोडी जाणून घेत असतो, असे त्यांनी सांगितले.



यावेळी यदुनाथ जोशी म्हणाले की, पत्रकारांकडून समाजाला अपेक्षा असतात. परंतु, पत्रकारांच्या सोयी-सुविधांकडे समाज व्यवस्थेचे दुर्लक्ष असते. वर्तमानपत्रांनी अनेकांना मोठे केले आहेत. परंतु ही माणसे आज वर्तमानपत्रांना विसरल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. अलीकडे इलेक्ट्रॉनिक मिडियाचा प्रभाव असला तरी आकाशवाणी प्रमाणेच वर्तमानपत्रांना पुन्हा सुगीचे दिवस येतील, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. प्रादेशिक वाद व असमानता असताना आता उपप्रादेशिक वाद पुढे येत आहे. विकास म्हणजे नागपूर दिसतो. यात अमरावती विभाग दिसून येत नाही. यादृष्टीने आता पावले उचलली गेली पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

राज्य अधिस्वीकृती अध्यक्ष म्हणून आपण पत्रकारांच्या हक्कासाठी सरकारकडे पाठपुरावा करीत असतो. केवळ अधिस्वीकृतीच नव्हे तर पत्रकारांना पेंशन व आरोग्य सुविधाबाबत शासनाचे धोरण ठरावे,यासाठी श्रमिक पत्रकार संघटनेसह सर्वच संघटनांनी एकत्रित यावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी ज्येष्ठ संपादक नानक आहुजा यांनी वर्तमानपत्रांपुढे आवाहनांची माहिती दिली. कोरोना काळानंतर विभागीय पातळीवर वर्तमानपत्रांना जाहीराती मिळण्याचे प्रमाण कमी झाले आहे. स्थानीक वर्तमानपत्रे आज आर्थिक सामना करीत असल्याने शासनाने याकडे लक्ष द्यावे असे ते म्हणाले. यावेळी माहीती संचालक हेमराज बागुल म्हणाले की, प्रशासकीय अधिकारी आपण असलो तरी पूर्वी आपण पत्रकारिता केली. त्यामुळे पत्रकारांच्या समस्यांची जाण आहे. त्यामुळे पत्रकारांना त्यांचे हक्क मिळावे यासाठी आपण सदैव प्रयत्नशील असतो असे त्यांनी सांगितले.

अमरावती श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष गोपाल हरणे यांनी अध्यक्षीय भाषणात सुरेश शुक्ल यांची कारकीर्द व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल सांगितले. श्रमिक पत्रकार संघाचे प्रलंबित मुद्दे सरकारकडून सोडविण्याची मागणी यदुनाथ जोशी यांच्याकडे केली. श्रमिक पत्रकार संघाचे सचिव रवींद्र लाखोडे यांनी प्रास्ताविक केले. पत्रकारितेसाठी आयुष्य वेचलेल्यांचा सन्मान करण्याचा संघाचा प्रयत्न केला. यातून नव्या पत्रकारांना प्रेरणा मिळत असल्याचे त्यांनी म्हटले. कार्यक्रमाचे संचालन गिरीश शेरेकर यांनी केले. अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणून राज्यपालांनी नियुक्ती केल्याबद्दल गिरीश शेरेकर यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार कुमार बोबडे यांनी कार्यक्रमादरम्यान सत्कारमूर्ती सुरेश शुक्ल यांच्या कारकिर्दीचा उपस्थितांना परिचय करून दिला. सुरेश शुक्ल यांनी पत्रकारितेचा आदर्श पुढे मांडल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाला राज्य अधिस्वीकृती समितीचे सदस्य व ज्येष्ठ संपादक ॲड. दिलीप एडतकर, वरिष्ठ पत्रकार अनिल जाधव, संपादक जयराम आहूजा, प्रवीण आहूजा यांचेसह भाजपचे प्रदेश पदाधिकारी प्रा. दिनेश सूर्यवंशी, श्रमिकचे पदाधिकारी अमोल इंगोले, कृष्णा लोखंडे, प्रदीप भाकरे, प्रवीण कपीले, शैलेश धुंदी, भैय्या आवारे, सुरेंद्र आकोडे, त्रिदीप वानखडे, वैभव बाबरेकर, धनंजय साबळे, मिनाक्षी कोल्हे, श्रीरंग ढोके, अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोहर सूने, युसुफखान, बाळासाहेब सोरगिवकर आदी उपस्थित होते.

# जिल्ह्यात आतापर्यंत बोगस ५४०० बॅगची विक्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती–** यंदा जिल्ह्यात समाधानकारक पाऊस झाल्याने सध्याघडीला पेरणीनंतर शेतातील पिके बऱ्यापैकी बहरली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी खतांची खरेदी सुरू केली आहे. परंतु, पुण्याच्या एका कंपनीव्दारे जिल्ह्यातील कृषी सेवा केंद्राना पुरवठा असलेल्या डीएपी खतांच्या बॅगमध्ये माती आढळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कृषीविभागाने मंगरूळ चव्हाळा येथील एका कृषी केंद्रातून ४५५ पोते जप्त केल्याने हे घबाड समोर आले.जिल्ह्यात ५ हजार ४०० शेतकऱ्यांनी हे मातीमिश्रीत डीएपी खत वापरलेले आहे. कृषी विभागाने शहर व ग्रामीणमधील १३ कृषी केंद्राना नोटीस दिली असून पुण्याच्या कंपनी विरोधात सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहे. मंगरूळ चव्हाळा येथील एका कृषी केंद्रात बोगस खतांची विक्री होत असल्याची माहिति जिल्हा कृषी अधिक्षक विभागाला मिळाली. निरिक्षकांच्या पथकाने – मंगरूळ चव्हाळा येथील ३ कृषी – सेवा केंद्रावर धाड घालून डीएपी – खतांची ४५३ पोते जप्त केले – आहे. हे खत पुणे येथील मे. रामा फट्रीकल्स नामक कंपनीने तयार – केले आहे. खतांच्या पोत्यावर प्रधानमंत्री भारतीय जनउर्वरक – परियोजना, भारत एनपीके असे लिहलेले आहे. डीएपीच्या खतामध्ये मोठ्या प्रमाणात माती असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे कृषी विभागाने मंगरूळ चव्हाळा येथील कृषीकेंद्राचे सर्व ४५३ पोते जप्त केले. चौकशी केली असता पुण्याच्या रामा फट्रीकल्स कंपनीने जिल्ह्यातील १३ कृषी सेवा केंद्रांना आतापर्यंत डीएपी खतांचया ३ हजार ५०० बॅग व १०-२६-२६ खतांच्या २१०० बॅग अशा एकूण ५ हजार ४०० बॅगचा पुरवठा केला आहे.

# सुनील केदार यांना दीडशे कोटींच्या वसुलीची नोटीस

## प्रक्रियेला सुरुवात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नागपूर–** माजी मंत्री व नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष सुनील केदार यांच्याकडून सरकारी रोखे खरेदी घोटाळ्याची १५० कोटींपेक्षा जास्त रक्कम वसूल करण्याच्या प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. राज्य सरकार यातील एकेक अडथळे दूर करण्यासाठी पावले उचलायला लागले आहे. विशेष म्हणजे, गेल्या शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयानेही केदार यांच्या दोषसिद्धीला स्थगिती दिली नाही. केदार यांनी इतर आरोपींसोबत मिळून या बँकेत २००२ मध्ये १२४.६० कोटी रुपयांचा सरकारी रोखे खरेदी घोटाळा केला. तेव्हापासूनच्या व्याजाचा विचार केल्यास या घोटाळ्यामुळे बँकेचे १५० कोटीं पेक्षा जास्त रकमेचे नुकसान झाले आहे.

### यापूर्वी १२९ कोटींची निघाली होती वसुली

सहकार विभागाचे लेखाधिकारी यशवंत बागडे यांनी २८ नोव्हेंबर २०१३ रोजी चौकशी पूर्ण झाल्यानंतर केदार यांच्यासह ८ जणांना घोटाळ्यास जबाबदार धरले होते व केदार यांच्यावर १२९ कोटी ३१ लाख ३३ हजार रुपयांची जबाबदारी निश्चित केली होती. ही रक्कम १३ मे २००२ पासून १२% व्याजासह एक महिन्यात जमा करण्याचे आदेश दिले होते.

# जड वाहतुकीमुळे रस्त्याची दुरावस्था

## शेवतीवासीयांनी अडविले ट्रक

### ग्रामपंचायत आकारते शंभर रुपये खासगी टोल नाका

### संतप्त ग्रामवासीयांची रस्ता दुरुस्तीची मागणी


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ नांदगाव पेठ –** राख, गिट्टी, मुरूमाच्या ओव्हरलोड आणि बेकायदेशीर वाहतुकीमुळे शेवती येथील मुख्य रस्त्याची दूरावस्था झाली आहे.अनेकदा तक्रारी देऊनही ग्रामपंचायतने रस्त्याची दुरुस्ती न केल्याने शनिवारी सकाळी संतप्त शेवतीवासीयांनी सर्व ट्रक थांबवून रास्ता रोको आंदोलन केले. गावकऱ्यांनी एकत्र येऊन शासनाच्या धोरणाचा निषेध करत जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत येथून एकही मोठे वाहन जाणार नाही अशी भूमिका घेतली. शेवती जहागीर गावाच्या आजूबाजूला स्टोन क्रशर तसेच अनेक खदानी असून येथून गिट्टी व मुरुमाचे उत्खनन करून क्षमतेपेक्षा अधिक वाहतूक करण्यात येत आहे.या जड वाहतुकीमुळे जळका शहापूर, शेवती जहागीर ते मासोद या मार्गाची अक्षरशः दुरावस्था झालेली असून या रस्त्यावरून पायदळ चालणे अशक्य झाले आहे.अनेक दुचाकी घसरून याठिकाणी अपघात झालेले आहेत तर शाळेच्या विद्यार्थ्यांना पावसाळ्यात ये जा करणे देखील कठीण होत आहे. अश्या परिस्थितीत काही नागरिक ग्रामपंचायत मध्ये निवेदन घेऊन गेले तर महिला सरपंच चक्क युवकांच्या अंगावर गेल्या. आणि कुणाकडून काय होते ते करून घ्या रस्ता बनणार नाही अशी आडमुठी भूमिका घेतली. या मार्गावरून जाणाऱ्या शेकडो वाहनांकडून प्रत्येकी शंभर रुपये खासगी टोल ग्रामपंचायत आकारत असून आतापर्यंत ग्रामपंचायतकडे दहा लक्ष रुपये जमा असल्याचा आरोप गजानन लुंगे यांनी केला असून त्याच पैशातून आम्हाला रस्ता बनवून द्यावा अशी मागणी यावेळी लुंगे यांनी केली आहे. जोपर्यंत आम्हाला रस्ता दुरुस्त करून देत नाही तोपर्यंत एकही ट्रक या मार्गावरून जाऊ देणार नाही असा पवित्रा गावकऱ्यांनी घेतलेला आहे.आंदोलनात नागरिक, विद्यार्थी, युवक सहभागी झाले



# येत्या २४ तासात अप्पर वर्धा धरणाची दरवाजे उघडण्याची शक्यता

## जलसाठ्यात वाढ, नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ मोर्शी** येथील अप्पर वर्धा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या 'संततधार पावसामुळे अप्पर वर्धा धरणाच्या जलसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत असून येत्या २४ तासात अप्पर वर्धा धरणाची दरवाजे केंव्हाही उघडू शकतात. त्यामुळे नदी काठच्या गावांना तसेच मासेमाऱ्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



याबाबत पत्र अप्पर वर्धा धरण विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी अमरावती, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर यांना रवाना करण्यात आले आहे. अप्पर वर्धा धरणाची दरवाजे उघडण्याची वेळ येऊ शकते. अमरावती जिल्ह्यात सर्वात मोठे धरण असलेल्या अप्पर वर्धा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दोन दिवसांपासून सतत पाऊस कोसळत असल्यामुळे धरणाच्या जलसाठ्यात दररोज वाढ होत आहे. मध्यप्रदेशातून वाहत येणाऱ्या जामनदी व माडू नदीला मोठ्या प्रमाणात पूर आल्यास तसेच अप्पर वर्धा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाणी कोसळल्यास धरणाच्या जलसाठ्यात प्रचंड वाढ होऊ शकते व अप्पर वर्धा धरणाची दरवाजे २४ तासात केंव्हाही उघडू शकते, असे अप्पर वर्धा धरण विभागाच्या उपविभागीय अभियंता मनाली नंदागवळी यांनी सांगितले.

# 'मी माझ्या परीक्षेत फेल पण...' नवनीत राणांनी स्पष्ट केली पुढची दिशा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती:** नवनीत राणा यांचा अमरावती लोकसभा मतदार संघातून पराभव झाला. त्यानंतर काही काळ त्या सार्वजनिक कार्यक्रमापासून दूर होत्या. नुकत्याच त्या अमरावतीत एका सार्वजनिक कार्यक्रमात दिसल्या. यावेळी त्यांनी मी पुन्हा येईनचा सुर आळवला. तर त्यांचे पती आमदार रवी राणा यांनी नवनीत यांचा पराभव कोणामुळे झाला हेच जाहीर पणे सांगितले. पराभव झाला असला तरी भविष्यातील आपले नियोजन काय असे हे त्यांनी स्पष्ट केले आहे. लोकसभा पराभवानंतर नवनीत राणा आता नव्याने मतदार संघात सक्रीय झाल्या आहेत. त्या बऱ्याच कालावधीनंतर सार्वजनिक कार्यक्रमात दिसल्या. मी माझ्या परीक्षेत फेल झाली. पण मेरिटमध्ये येणार विद्यार्थी नापास झाला तर त्याच दुःख काय असते ते मला माहिती आहे असं सांगायलाही त्या विसरल्या नाहीत. कदाचीत कुठे तरी मी कमी पडली असेल. पण पुन्हा नव्याने तयारीला लागणार आहे. अमरावतीच्याच मैदानात आपण नक्की उतरणार आहे असे सांगत या पुढेही राजकारणात सक्रीय राहाणार असल्याचे त्यांनी



सांगितले. नवनीत राणा यांच्या पराभवाला स्थानिक नेते जबाबदार आहेत. नवनीत राणा यांचा पराभव व्हावा यासाठी सगळे नेते एकत्र आले होते. त्यामुळेच नवनीत राणा यांचा पराभव झाला. पण नवनीत राणा यांचा पराभव करून काही राजकीय नेत्यांचं जरी भलं झालं असलं तरी अमरावती जिल्ह्याचं मोठं नुकसान झाले आहे असे यावेळी आमदार रवी राणा म्हणाले. जिल्ह्याला एक विकासाचं व्हिजन देण्याचे काम नवनीत राणा यांनी केलं होतं, तेच व्हिजन थांबवलं गेलं असं ही ते म्हणाले. देशात जे काही मोजकेच खासदार चर्चेत होते त्या पैकी एक नवनीत राणा होत्या. त्यांचं नाव देशात होते असेही रवी राणा म्हणाले. नवनीत राणा यांचा लोकसभेत झालेला पराभव रवी राणांच्या चांगलाच जिव्हारी लागला आहे. राणा यांना पराभूत करण्यासाठी जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेते एकत्र आल्याचा राणा यांचा आरोप आहे. महायुतीतील बच्चू कडूंनी तर राणा यांना जाहीर विरोध केला होता. शिवाय त्यांनी आपल्या पक्षाचा उमेदवारही मैदानात उतरवला होता. काँग्रेसच्या बळवंत वानखडे यांनी नवनीत राणा यांचा पराभव केला.

# तिर्थयात्रेच्या नावावर ३५ वृध्दांचे हडपले 3 लाख

## यात्रा रद्द झाल्याचे सांगून झाला फरार राजापेठ पोलिस ठाण्यात फसवणूकीचे गुन्हे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती –** यात्रा कंपनी चालविणाऱ्या दोन भामट्यांनी ३५ वृध्दांना तीर्थयात्रेवर नेण्याचे आमिष देऊन सुमारे ३ लाखा पेक्षा जास्तची रक्कम हडपली. तसेच पावसामुळे परवानगी मिळाली नसल्याने यात्रा रद्द झाल्याचे सांगून दोन्ही ठगबाज फरार झाले. राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या परिसरात ही घटना घडली असून याबाबत पोलिसांनी दोन ठगबाजांविरोधात गुन्हे दाखल केले आहे. सतीष काजे, रा.न्यू गणेश कॉलनी, राजु अटाळकर, रा. माहुली धांडे असे गुन्हे दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. काशिनाथ महादेवराव काकड (६४) रा. आकांक्षा विहार, जुना बायपासरोड, अमरावती यांच्या तक्रारीवरून सतीष काजेवर व राजू अटाळकर महिलेच्या याच्यावर तक्रारीवरून फसवणूकीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. माहितीनुसार, आरोपी सतीष काजे हा वृध्दांसाठी तिर्थयात्रेचे आयोजन करतो. १३ नोव्हेंबर २०२३ला काशिनाथ काकड यांची कुणाच्या तरी




माध्यमातून सतीष काजेसोबत ओळख झाली. सतीषनेत्यांना १३ हजार रूपयात आठ दिवसाच्या तिर्थयात्रोचा प्लान समजावून सांगितला. काशिनाथ है सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी असल्याने त्यांची बरीच ओळख होती. त्यामुळे काशिनाथने सुमारे ३५ लोकांकडून तिर्थयात्रेच्या नावावर प्रत्येकी १० ते १३ हजार रूपये घेतले. परंतु, अचानक तीन महिन्यानंतर तिर्थयात्रा रद्द झाल्याचे सतीष काजे याने जाहीर केले आणि तो लोकांचे घेतलेले पैसे न देता फरार झाला. असाच प्रकार आरोपी राजू अटाळकर यांने महिलेसोबत केला. त्यामुळे दोघांनी याबाबत राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दिली. दोन्ही आरोपींविरोधात फसवणूकीचे गुन्हे दाखल केले आहेत.

# २ हजार ५९ उमेदवारांनी दिली ग्रामीण पोलीस शिपाई पदाची लेखी परीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती–** अमरावती ग्रामिण पोलीस शिपाई भरती लेखी परीक्षा रविवारी दुपारी १२ वाजता अमरावती– बडनेरा मार्गावरील प्रा. राम मेघे अभियांत्रीकी महाविद्यालय येथे घेण्यात आली. त्यावेळी परीक्षेकरीता पात्र २ हजार ११० उमेदवारांपैकी एकुण २ हजार ५९ उमेदवारांनी लेखी परीक्षा दिली. १९८ जागांकरिता मागील २ महीन्यांपासून पोलीस भरती प्रक्रिया सुरू असून सदर प्रक्रियेतील पहीला टप्पा मैदानी चाचणी होता. मैदानी चाचणीतून एकूण २ हजार ११० उमेदवार लेखी परीक्षेकरिता पात्र ठरलेले होते. सदर पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा रविवारी (२८ जलै) रोजी अमरावती–बडनेरा रोड येथील प्रा. राम मेघे, अभियांत्रीकी महाविद्यालय येथे ११ वाजता आयोजीत करण्यात आली होती. सुरू असलेल्या पावसामुळे उमेदवार हे न उशिरापर्यंत परीक्षा केन्द्रावर येणे चालु होते ही बाब लक्षात घेता उमेदवारांना लेखी परीक्षेकरीता हजर राहणे शक्य व्हावे या बाबीचा विचार करून सदर परीक्षा आज रोजी नियोजित वेळेऐवजी दुपारी १२ वाजता सुरू करून दुपारी १.३० पर्यंत घेण्यात



आली.लेखी परीक्षेकरिता पात्र २ हजार ९९० उमेदवारांपैकी एकुण २ हजार ५९ उमेदवार हजर होते. सतत सुरू असलेल्या पावसामुळे उमेदवारांना येणाऱ्या अडचणीचा सहानभुतीपुर्वक विचार करून कोणताही उमेदवार परीक्षा देण्यापासून वंचित राहणार नाही याची विशेष काळजी अमरावती ग्रामिण पोलीस दलातर्फे घेण्यात आली व उमेदवाराना आलेल्या अडचणी तत्काळ सोडवून देण्यात मदत करत उमेदवारांना लेखी परीक्षेला बसण्याची परवानगी देण्यात आली. पोलीस भरती लेखी परिक्षा राबविण्याकरिता पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली दोन पोलीस उपअधीक्षक, १४ पोलीस निरीक्षक, ८० सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक तसेच ३५० पोलीस अमंलदार नेमण्यात आले होते. सदरची लेखी परीक्षा अत्यंत शिस्तीत व सुरळीतपणे घेण्यात आली आहे. सदर परीक्षेची आदर्श उत्तरपत्रिका अमरावती ग्रामिण पोलीस दलाचे अधिकृत संकेतस्थळावर लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. तसेच पोलीस भरती प्रक्रियेबाबत ईतर सूचना किंवा मार्गदर्शनसुध्दा यापुढे उमेदवारांना अमरावती ग्रामिण पोलीस दलाचे अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्यावतीने आले.

# जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या चिमुकल्यांचे आरोग्य धोक्यात

## शाळेच्या प्रवेशद्वारासमोरील डबके

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती–** अमरावती जिल्ह्यात सध्या सर्वत्र जोरदार पाऊस पडत आहे. काही तालुक्यात आजारांनी डोके वर काढले आहे. घाण युक्त साचलेल्या पाण्याचा निचरा होत नसल्याने व्हायरल स्वरूपाचे आजार नागरिकांना होत आहे. अशा बदलत्या वातावरणामुळे शाळा परिसरात घाण युक्त पाणी साचून असलेल्या डब्यातून विद्यार्थ्यांना दररोज जाणे– येणे करणे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून कितपत योग्य आहे ? असा सवाल काही ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

अंजनगाव तालुक्यातील कापुसतळणी अंतर्गत नारायणपूर येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या प्रवेशद्वारा समोर बरेच दिवसापासून घाण युक्त पाण्या चे मोठे डबके साचलेले आहे. शिक्षण घेण्यासाठी त्याच घाण युक्त साचलेल्या पाण्याच्या डबक्यातुन चिमुकल्या विद्यार्थ्यांना दररोज जा – ये करावे लागत आहे, परंतु हे त्यांचे आरोग्याला धोका धोकादायक असल्यामुळे त्यांच्या पालकांनी सदर समस्या ग्रामपंचायत सचिव यांच्या निदर्शनात आणून सदर डबकं बुचविण्याची विनंती केली. परंतु एक आठवडा होऊन सुद्धा डबकं बुजवल्या गेले नाही. अशा परिस्थितीत मुलांच्या आरोग्यास धोका निर्माण होणे नाकारता येत नाही. म्हणून मुलांना न्याय मिळावा या दृष्टीने शाळा शिक्षण समिती अध्यक्ष रहिमत खान व इतर पालक यांनी



गावातील पक्षीमित्र अरुण शेवाणे यांना सदर ठिकाणी बोलावून न्याय मिळावा अशी विनंती केली. त्यामुळे पक्षीमित्र अरुण शेवाणे यांनी ग्रामसचिवाला २४ तासाचा अल्टिमेटम देऊन सदर डबकं बुजविण्यास सांगितले. अन्यथा सदर डबक्यात विद्यार्थ्यांसह आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला. साचलेल्या पाण्याच्या डबक्याची अवस्था पाहून अधिकारी जागृत होणार की चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व आरोग्याची खेळणार की काय याकडे आत ग्रामस्थांचे लक्ष लागलेले आहे.

# २६ ड्रमसह २७७ लिटर गावठी दारूसाठा केला नष्ट

## वडाळी परिसरात गुन्हेशाखेची धडक कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती**

अमरावती वडाळी परिसरातील परिहारपुरा आणि पारधी बेडा येथील गावठी दारुच्या अड्डयावर गुन्हेशाखेच्या दोन्ही युनिटने धडक कारवाई करून २६ ड्रम व २७७ लिटर दारूसाठा नष्ट करून एका महिलेसह युवकाला अटक केली. अनिता मनोज बेनीवाल (रा. परिहारपुरा) आणि बादशहासिंग अजाबसिंग टांक (रा. भारतनगर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

वडाळी येथील भारतनगर, परिहारपुरा आणि पारधी बेडा या तिन्ही परिसरात मोठ्या प्रमाणात गावठी दारू काढल्या जाते आणि शहरातील काही भागात चोरमार्गान पुरविल्या जाते. त्यामुळे अमरावती शहरातील काही भागात गावठी दारू विकल्या जात आहे. या आधी सुध्दा फ्रेजरपुरा पोलिसांनी या परिसरात धाडी टाकून कारवाई केली होती. तरीसुध्दा दर दिवसाला या परिसरात मोठ्या अमाणात गावठी दारू काढली जाते. त्यामुळे गुन्हेशाखेच्या दोन्ही युनिटने वेगवेगळे पथक गठीतकरून एकाच वेळी तिन्ही परिसरात धाडी टाकून दारुसाठा जप्त केला. भारतनगर, पारधी बेडा परिसरात बादशहासिंग टांक हा सार्वजनीक ठिकाणीच गावठी हातभट्टी लाऊन दारु गाळतांना दिसताच पोलिसांनी त्याला रंगेहात पकडले. तसेच त्याच्या ताब्यातून २३ ड्रम सडवा मोहा आणि २१५ लिटर गावठी दारु व काढण्याचे साहित्य असा एकूण १ लाख ७० हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून सडवा मोहा व गावठी दारू तिथेच नष्ट करण्यात आली. तसेच परिहारपुरा येथील अनिता बेनीवाल हिच्या घरी धाड टाकली असता तीने घरातच गावठी दारुची भट्टी लावली होती आणि भट्टीमधून दारु गाळतांना मिळून आली. तेव्हा लगेच पोलिसांनी तीला ताब्यात घेवून ३ ड्रम सडवा मोहा आणि ६२ लिटर गावठी दारू तसेच दारु काढण्याचे साहित्य असा एकूण २७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच तिथेच सडवा मोहा व गावठी दारू नष्ट करुन दोघांवर कायदेशीर कारवाई करून अटक केली.

सदरच्या कारवाईत गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक मनिष वाकोडे, सत्यवान भुयारकर, पोलीस कर्मचारी राजु अप्पा, फिरोज खान, अजय मिश्रा, मंगेश शिंदे, दिनेश नांदे, चेतन कराळे, सुरज चव्हाण, निखील गेडाम, राजीक रायलीवाले, अमर कराळे, ज्योती झाडे, दर्शना वानखडे, वैशाली बनारसे तसेच आर.सी.पी. पथक आणि मुख्यालय येथील पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

# 'लाडक्या बहिणी'त गुंतल्या 'ताई'; चिमुकल्यांना शिकवावे कोणी?

## अंगणवाडीचे कामकाज प्रभावित : नऊ पर्याय, मात्र एकावरच भार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ अमरावती–** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत अर्ज भरण्यासाठी गावपातळीवर अंगणवाडी सेविका, मदतनिसांकडे गर्दी होत असल्याने अंगणवाडीचे कामकाज प्रभावित होत आहे. या योजनेचे अर्ज सादर करण्यासाठी १० पर्याय असतानाही अंगणवाडी सेविकांकडेच गर्दी होत असल्याने चिमुकल्या विद्यार्थ्यांना शिकवावे कसे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य, स्वावलंबन, सर्वांगीण विकासा च्या हेतूने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्यात १ जुलैपासून राबविण्यात येत आहे. या योजनेनुसार राज्य सरकारकडून २१ ते६० वय असलेल्या महिलांना दरमहा




१५०० रुपये बँक खात्यात जमा केले जाणार आहेत. या योजनेसाठी अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या शिवाय अन्य ९ जणांकडून अर्ज भरून घेतले जातात किंवा ९ जणांकडे संपर्क साधता येतो. असे असतानाही गावपातळीवरील अंगणवाडी केंद्रांतच गर्दी होत असल्याने अंगणवाडीचे कामकाज प्रभावित होत असल्याचा सूर अंगणवाडी सेविकांमधून उमटत आहे.या योजनेच्या माध्यमातून फॉर्म भरून घेत असताना प्रशासनाने वेळोवेळी आढावा घेण्याकरिता बैठकांचे सत्र सुरू ठेवल्याने बैठकांमध्येही अंगणवाडी सेविकांचा वेळ जात आहे. यामुळे अंगणवाडी केंद्रांतील काम प्रभावित होत असल्याचे चित्र ग्रामीण भागात आहे.

### अर्जासाठी हे आहेत नऊ पर्याय

- समूह संसाधन व्यक्ती (सीआरपी
- बचत गट अध्यक्ष
- बचत गट सचिव
- अंगणवाडी सेविका/मदतनीस
- ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकार
- वॉर्ड अधिकारी
- आपले सरकार सेवा केंद्र / सेतू केंद्र
- गृहिणी सामान्य महिला–

# अंगणवाडीत चिमुकल्यांना छत्री उघडून बसण्याची वेळ

## स्लॅब ची दुरुस्ती न करताच बिल काढले काय ?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती–**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील कापुसतळणी येथील अंगणवाडी केंद्र क्र. ७४ या इमारतीची तीन महिन्या अगोदर दुरुस्त केली. परंतु पहिल्याच पावसात सदर इमारतीच्या स्लॅब ला पावसाच्या पाण्याची पूर्वीपेक्षा जास्त गळती लागल्याने शिक्षण घेण्यासाठी येत असलेल्या चिमुकल्यांवर छत्री घडून बसण्याची वेळ आली आहे. त्यामुळे त्यांच्या शिक्षणासह आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. स्लॅबची दुरुस्ती न करताच बिल काढले होते की काय असा असा सवाल पक्षीमित्र तथा प्रहार संघटना उपतालुकाप्रमुख अरुण शेवाणे यांनी लेखी तक्रार देऊन उपस्थित केला आहे. अंगणवाडी केंद्र क्र.७४ या इमारतीच्या स्लॅब ला जुलै २०२३ च्या पावसाच्या पाण्याची गळती लागल्याची बाब गावातीलच पक्षीमित्र अरुण शेवाणे यांना माहित पडली. लगेच अरुण शेवाणे यांनी गटविकास अधिकारी विनोद खेडकर यांना माहिती देऊन त्वरित इमारत दुरुस्तीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची विनंती केली होती. त्या अनुषंगाने खेडकर साहेब यांनी सदर अंगणवाडी केंद्राची पाहणी करून चिमुकल्यांना दुसऱ्या ठिकाणी बसविण्यास सांगितले. व लगेच प्रस्ताव शासनाकडे मंजुरी करिता पाठविला. इमारत दुरुस्तीचे काम मंजूर होऊन एप्रिल २०२४ मध्ये सदर इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरू झाले. काम सुरू असताना अंदाज पत्रकानुसार बांधकाम दुरुस्ती होत नसल्याची माहिती पक्षीमित्र अरुण शेवाणे यांनी पंचायत समितीचे बांधकाम इंजिनिअर श्री जायबाय यांना दिली होती. परंतु जाणीवपूर्वक इंजिनीयरने सदर कामात दुर्लक्ष केले . त्यामुळे



तीन महिन्यातच म्हणजे पहिल्या पावसाच्या पाण्यात सदर इमारतीचा स्लॅब ला पूर्वीपेक्षा पावसाच्या पाण्याची गळती लागलेली आहे. त्यामुळे चिमुकल्यांवर छत्री उघडून बसण्याची वेळ आली असल्याचे अंगणवाडी सेविका, मदतनीस व पालक यांनी अंगणवाडी परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम सुरू असतांनाच ग्रामविकास अधिकारी विजय कथळकर यांना सांगितले हे विशेष. सदर कामाची चौकशी व्हिडिओ शूटिंग करून करावी तसेच संबंधित ठेकेदाराचा परवाना रद्द करण्यात यावा तसेच झालेल्या खर्चाची रक्कम वसूल करण्यात यावी तसेच चिमुकल्यांची इतर ठिकाणी बसण्याची सोय करावी व इमारत दुरुस्त करण्यात यावी. अन्यथा चिमुकल्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने सदर इमारत मध्ये आंदोलन करण्यात येईल. असा इशारा प्रहार संघटनेचे अरुण शेवाणे यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे.

# राणा दाम्पत्यांनी केला ५ हजार विद्यार्थ्यांचा सत्कार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने दहावी व बारावीच्या गुणवत्ताप्राप्त तसेच सीए व खेळांमध्ये प्राविण्यप्राप्त खेळाडूंचा आ. रवी राणा व माजी खासदार नवनीत राणा यांच्या हस्ते येथील सांस्कृतिक भवनात रविवारी सत्कार करण्यात आला. ४,७२३ विद्यार्थ्यांना राणा दाम्पत्याच्या हस्ते प्रमाणपत्र, स्कूल बॅग व स्मृतिचिन्हाद्वारे कौतुकाची थाप देण्यात आलेली आहे.आ. रवी राणा व माजी खासदार नवनीत रवी राणा यांच्याद्वारा १५ वर्षांपासून दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या यशाबद्दल सत्कार केल्या जातो. कार्यक्रमाला खा. डॉ अनिल बोंडे उपस्थित होते. आपण खासदार असताना विद्यार्थ्यांना संसद भवन दाखविले होते. त्यानुसार यावर्षीसुद्धा विद्यार्थ्यांना संसद भवन दाखवेल, अशी ग्वाही नवनीत राणा यांनी विद्यार्थ्यांना दिली. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून त्यांचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहन आ. रवी राणा यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाला नीळकंठराव कात्रे, सुनील राणा, शैलेंद्र कस्तुरे, जितू दुधाने, योगिता कोलटके, अजय देशमुख, संजय हिंगासपुरे, ज्योती सैरीसे, सुमती ढोके, नितीन बोरेकर, विनोद जायवाल, अर्चना तालन, चंदा लांडे, विनोद गुहे, नाना आमले, किरण अंबडकर, आशिष गावंडे, बंडू डुकरे, आशिष कावरे, अमोल कोरडे, सोनाली नवले, रवींद्र गवई, सागर खंडारे, अजय मोरया, ज्योती यावलीकर, रमेश अवघड, सुधीर लवणकर, गणेशदास गायक ड, अजय घुले, रवी वानखडे, अविनाश काळे, सचिन भेंडे, गणेश गायकवाड, चंद्रशेखर जावरे, नीलेश भेंडे, अनुप खडसे, गौतम हिरे यासह गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक, युवा स्वाभिमानचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र रिद्धपूरला १० सप्टेंबरपासून सर्व गाड्यांचा रेल्वे थांबा

## रेल्वे मंडळाच्या प्रबंधकांकडून पाहणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ रिद्धपूर**

श्रीक्षेत्र रिद्धपूर येथे सहा महिन्यांपूर्वी रेल्वे स्थानकाचे भूमिपूजन झाले होते. त्याचे काम पूर्णत्वास गेले असून श्रीगोविंद प्रभू जयंतीपूर्वी १० सप्टेंबर रोजी भुसावळ-नरखेड पॅसेंजरला येथे थांबा मिळणार आहे. या थांब्यामुळे भाविकांना हे तीर्थक्षेत्र रेल्वेने थेट गाठता येणार आहे.श्रीगोविंद प्रभू तीर्थस्थान येथील अध्यक्ष महंत कारजेकर बाबा व सचिव महंत वाईदेशकर बाबा यांनी रेल्वे अधिकाऱ्यांकडे आषाढी एकादशीपूर्वी रेल्वे स्थानक सुरू करण्याची मागणी केली होती. परंतु, तांत्रिक कारणांमुळे त्यापूर्वी रेल्वे स्थानक सुरू झाले नाही. २८ जुलै रोजी श्रीक्षेत्र रिद्धपूर येथील पूर्णत्वास आलेल्या रेल्वे स्थानकाच्या पाहणीकरिता नागपूर स्थित रेल मंडळ प्रबंधक मनीष अग्रवाल यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांनी पाहणी केली. १० सप्टेंबर रोजी भुसावळ-नरखेड पॅसेंजर रिद्धपूरला थांबेल आणि एक ते दोन वर्षांनंतर सर्वच एक्स्प्रेस गाड्या थांबतील. ६०० मीटर प्लॅटफॉर्म, आरक्षण सुविधा, राजमठासदृश प्रवेशद्वाराचे आश्वासन त्यांनी दिले. यानंतर त्यांनी श्री गोविंदप्रभू राजमठ मंदिर येथे जाऊन दर्शन घेतले. त्यांचा शाल-श्रीफळ देऊन महंत कारंजेकर बाबा व महंत वाईदेशकर बाबा यांनी सत्कार केला. यावेळी राजू विडकर, प्रमोद हरणे, प्रकाश बिडकर व नागरिक उपस्थित होते.

महानुभावपंथीयांची काशी आणि मराठीचा आद्यग्रंथ जेथे लिहिला गेला, अशा रिद्धपुरातील या घडामोडीने भाविकांनी आनंद व्यक्त केला आहे.

# अमरावतीत उड्डाणपूलावरिल पाण्याने भाजी धुवत असल्याचा व्हिडिओ व्हायरल...



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

अमरावतीच्या नवीन बायपास रोड वरील एका जनावरांच्या पाणी पिण्याच्या टाक्यातील पाणी दुधामध्ये टाकून दूध विक्रेते दूध विकत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता हा प्रकार ताजा असतानाच आता अमरावतीच्या कृषी उत्पन्न बाजार समिती समोर एक भाजी विक्रेता उड्डाण पुलावरील पाण्याने भाजी धुवत असल्याचा धक्कादायक व्हिडिओ समोर आला आहे.सध्या अमरावती मध्ये संतधार पाऊस सुरू आहे आणि या पावसामुळे मार्केटमध्ये येणारा भाजीपाला मातीने भिजला आहे. अशातच हा मातीने भिजलेला भाजीपाला धुण्यासाठी चांगला पाण्याचा वापर करण्या ऐवजी एक भाजीपाला विक्रेता हा उड्डाणपूलवरील पाण्याने भाजीपाला धूत असल्याचा व्हिडिओ सध्या वायरल झाला आहे त्यामुळे अशा पद्धतीने भाजीपाला धुणे कितपत योग्य आहे असा सवाल उपस्थित झाला आहे.

# पावसाची रिपरिप तरीही ३७ महसूल मंडळांत तूट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

जिल्ह्यात १० ते १२दिवसांपासून पावसाची रिपरिप सुरू असल्याने १० तालुके अन् ५५ मंडळात पावसाची सरासरी पार झालेली आहे. परंतु, चार तालुक्यात व त्यातील ३७ महसूल मंडळात पावसाची तूट आहे.

आयएमडीने ३१ जुलैपर्यंत पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला. स्कायमेटनुसार चिखलदरा तालुक्यात सरासरीच्या १०४.९, नांदगाव खंडेश्वर १३४.७, चांदूर रेल्वे १३५.१, तिवसा ११६.२, मोर्शी १००.४, वरुड १०७.४, दर्यापूर ११७.१, अंजनगाव सुर्जी १२१.६, चांदूरबाजार१२७.७ व धामणगाव तालुक्यात ११३.८ टक्के पावसाची नोंद झालेली आहे. हरिसाल मंडळात सर्वात कमी ३१.४ टक्के पाऊस झाला. धारणी, धुळघाट, सावलीखेडा, टेंब्रुसोडा, साद्राबाडी, चुर्णी, बडनेरा,




वनसारी, डवरगाव, वलगाव, माहुली, शिराळा, नांदगाव पेठ, आष्टी, निंबा, आसरा, खोलापूर, धाबा, लोणी, आमला, वऱ्हा, धामणगाव, वठोडा, राजूरा, दारापूर, खल्लार, अचलपूर, रासेगाव, असदपूर, परसापूर, पथ्रोट, परतवाडा, धामणगाव, अंजनसिंगी व दत्तापूर मंडळात पावसाने सरासरी गाठलेली नाही.

# सणा सुदीच्या तोंडावर १४३ रेशन दुकानात धान्य वाटप बंदचे लागले फलक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९चांदूर बाजार**

चांदूर बाजार तालुक्यासह जिल्ह्यातील स्वस्त रेशन दुकानातील पॉश मशीनमधील तांत्रिक अडचणीचा फटका गोरगरीब रेशन लाभार्थ्यांना बसला असून ग्राहकांच्या संतापाला वैतागून चांदूरबाजार शहरासह तालुक्यातील १४३ रेशन दुकानदारांनी पॉस मशीनमधील तांत्रिक अडचणीमुळे धान्य वाटप बंदचे फलकच दुकानावर



लावून दुकानांना ताळे ठोकले आहे.

वारंवार विनंती करूनसुद्ध पॉस मशीन सुरू होत नसल्याने त्रस्त झालेल्या स्वस्त धान्य दुकानदारांनी अखेर जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन देऊन पॉस मशीनची समस्या दूर करण्याची मागणी केली आहे.दरम्यान, पॉस मशीनमधील तांत्रिक अडचणीची समस्या संपूर्ण राज्यातच आहेत. यावर पुरवठा विभागाकडून उपाययोजना सुरू असून कोणताही लाभार्थी धान्यावाचून वंचित राहणार नाही यासाठी या महिन्याचे रखडलेले धान्यवाटप पुढील महिन्यातसुद्धा करण्यात येणार असल्याचे चांदूर बाजार येथील पुरवठा निरीक्षक शीतल आंबटकर यांनी स्पष्ट केले.

# 'लाडका शेतकरी दादा' योजना मुख्यमंत्र्यांनी राबवावी संत्रा/मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मोर्शी /वरुड**

सध्या राज्यात 'माझी लाडकी बहीण' पाठोपाठ भावाची योजना सुरू झाली आहे. अशा लाडक्यांकडून योजनेच्या लाभासाठी कागदपत्रांची जुळवाजुळव सुरू आहे. मात्र, जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्याला आश्वस्त करण्यासाठी शासनाने 'माझा लाडका शेतकरी दादा' ही योजना सुरू करावी, अशी मागणी आता ग्रामीण भागातील शेतकरी करीतआहे.

लाडकी बहीण व लाडका भाऊ या योजनेत लाभार्थ्यांना महिन्याला दीड हजार मिळणार आहे. मात्र, जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांसाठी जर शासनाने 'माझा



लाडका शेतकरी दादा'ही योजना आणून शेतकऱ्यांच्या मालाला उत्पादन खर्चानुसार हमीभाव मिळावा, ही रास्त अपेक्षा या योजनेंतर्गत हवी, अशी मागणी आहे.

शेती व्यवसाय हा पूर्णतः निसर्गाच्या भरवशावर आहे. हा अशाश्वत व्यवसाय शेतकऱ्यांचे जीवन डावावर लावतो. अनेक शेतकरी नापिकीमुळे कर्ज भरण्यास असमर्थ राहतात. परिणामी मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात. 'विदर्भाचा कॅलिफोर्निया' अशी बिरुदावली मिरवणाऱ्या वरूड-मोर्शी तालुक्यातील संत्रा मोसंबी फळबागांची अवस्था केविलवाणी आहे. येथल्या संत्रा, मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने न्याय द्यावा, ही मागणी आहे. 'माझा लाडका शेतकरी दादा' या योजनेत फळपिकांना विम्याचे कवच, योग्य भाव तसेच फळांवर आधारित वायनरी प्रकल्प येथे उभे केले की, संत्रा मोसंबी फळांच्या सर्व प्रतवारीच्या फळांना योग्य भाव मिळेल, हीच रास्त अपेक्षा व मागणी असल्याचे असंख्य संत्रा,मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांनीव्यक्त केल्या.

# गो.सी.टोम्पे कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण सप्ताह उत्साहात संपन्न




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ चांदुर बाजार**

स्थानिक गो.सी टोम्पे कनिष्ठ महाविद्यालयात केंद्रशासन निर्देशानुसार संपूर्ण देशभरात दिनांक २२ ते २८ जुलै २०२४ च्या दरम्यान शिक्षण सप्ताह या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. त्या अंतर्गत आज २८ जुलै रोजी नियोजित उपक्रमांतर्गत समुदाय सहभाग दिवस ( तिथी भोजन ) हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाकरिता प्रमुख अतिथी म्हणून श्री मनोज कटारिया, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते तर पर्यवेक्षक प्रा. प्रणित देशमुख तसेच प्रा. इंगळे ,प्रा. कु.बर्वे व्यासपीठावर उपस्थित होते.

केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या नुसार तिथी भोजन म्हणजे स्नेहभोजन उपक्रमाची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्याकरिता निर्देशित केल्याप्रमाणे गावातील दानशूर व्यक्ती ,लोकप्रतिनिधी, विविध सामाजिक संस्था आणि शाळा व्यवस्थापन समिती यांना तिथी भोजन देण्याकरिता आवाहन करण्यात आले होते. त्यात चांदूरबाजार नगरीतील दानशूर व्यक्ती श्री मनोज कटारिया यांनी विद्यार्थ्यांच्या स्नेहभोजनासाठी विशेष सहकार्य केले प्रस्तुत उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना जेवण व मोडआलेल्या धान्यापासून बनवलेल्या आहाराचा समावेश करण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. कु. बर्वे यांनी विद्यार्थ्यांना भोजनात कोणत्या पदार्थाचा समावेश करावा याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. माननीय श्री मनोज कटारिया आपल्या भाषणात म्हणाले की यानंतरही अशा प्रकारची संधी विद्यार्थ्यांचा करिता मला उपलब्ध करून द्यावी. कार्यक्रमाचे अध्यक्ष कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. प्रणित देशमुख यांनी दैनंदिन जीवनात अन्नपदार्थाची नासाडी कमी करून ग्रीन हाऊस उत्सर्जन कमी करण्याकरिता विद्यार्थ्यांनी आपले योगदान देण्याचे आवाहन केले व त्याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली. तसेच आज केलेल्या भोजन सहकार्यासाठी चांदुर बाजार नगरीतील दानशूर व्यक्तिमत्व श्री मनोज कटारिया , संस्थेचे अध्यक्ष मा. भास्करराव टोम्पे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामटेके सर यांचे विशेष आभार त्यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हरीश मोहकर यांनी केले. आजच्या कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक वृंदांनी सहकार्य केले. कार्यक्रमाकरिता कनिष्ठ महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# बेबी फूडमध्ये आढळल्या अळ्या, एक वर्षाच्या बाळाला झालं फूड पॉयजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २९ अमरावती**

अमरावतीत बेबी फूडमध्ये चक्क अळ्या आढळून आल्या आहेत. बेबीफूड बनविणाऱ्या नामांकित कंपनीच्या बेबी फूड पॉकेटमध्ये अळ्या आढळल्या आहेत. हे बेबीफूड खाल्ल्यानंतर दीड वर्षांचं बाळ आजारी पडलंय.

गेल्या तीन दिवसांपासून या बाळावर उपचार सुरू सरू आहेत. याप्रकरणी अन्न आणि औषध प्रशासनाकडे तक्रार करणार आसल्याचं बाळाच्या आईने सांगितलंय. याचा एक व्हिडिओही बाळाचा आईने शेअर करत आपला संपात व्यक्त केला आहे.

व्हिडिओ शेअर करत बाळाची आई म्हणाली आहे की, ''मला एक वर्षाचं बाळ आहे. आम्ही त्याला दुधाव्यतिरिक्त पौष्टिक आहार म्हणून बेबी फूड देतो. आता त्याला (बाळाला) बेबी फूडमुळे फूड पाइजनिंग झालं असून त्याला गेल्या चार-पाच दिवसांपासून बरं नाही. डॉक्टरांना दाखवलं असताना त्यांनी फूड पाइजनिंग झालं असल्याचं सांगितलं.''महिला पुढे म्हणाली आहे की, ''डॉक्टरांनी फूड पाइजनिंग झालं असल्याचं सांगितलं असता मी घरी येऊन बेबी फूडचे पाकीट पहिलं असता यात अळ्या आढळून आल्या आहेत.'' महिलेने संबंधित कंपनीवर कारवाई करण्यात यावी, अशी विनंती प्रशासनाला केली आहे.

# ज्येष्ठ नागरिकांचे आशीर्वादच उद्धव ठाकरेंना कार्य करण्याची प्रेरणा देणार

## माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती ११**

महाराष्ट्रात सध्या जे राजकारण सुरू आहे ते केवळ सत्तेसाठी आहे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोना काळातही नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला लाखो नागरिकांचे जीव वाचवले त्यांच्या कार्यकाळात सुरू झालेल्या योजनांचा आजही आस्थागायात नागरिक लाभ घेत आहेत ज्येष्ठ नागरिकांचे आशीर्वाद असेच



त्यांच्या पाठीशी असावेत व त्यांना उदंड आयुष्य लाभो कारण हे आशीर्वादच त्यांना कार्य करण्याची प्रेरणा देणार आहे असे प्रतिपादन माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील यांनी केले. मातोश्री वृद्धाश्रमात शिवसेना पक्षप्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. माजी आमदार धाने पाटील यांच्या वतीने उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त स्नेहभोजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सुरुवातीला शिवसेना पक्षप्रमुख हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या फोटोला माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या आशीर्वादासोबतच सर्व ज्येष्ठ नागरिकांचे आशीर्वाद उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी असावेत म्हणून देवाचरणी प्रार्थना करण्यात आली. मंचावर महानगर प्रमूख पराग गुडधे, महीला आघाडी जिल्हा संघटिका मनीषा टेंबरे, संपर्क संघटिका वर्धा कांचन ठाकूर, उपजिल्हा संघटिका विभा गोरखेडे, नितीन तारेकर, माजी उपजिल्हाप्रमुख महेश भेंडा, महानगरप्रमुख संजय शेटे, सुनील राऊत, ज्येष्ठ शिवसैनिक राजूभाऊ अक्कलवार, नगरसेवक रामा सोळंके, नगरसेवक बंडू धामणे, बाळासाहेब गावंडे, संजय गवाडे, योगेश धर्माळे, आनंद जोशी, प्रमोद धनोकार, सुरेश राठी, शेखर धेंडे उपस्थित होते.

# एस टी महामंडळ कर्मचारी घंटानाद आंदोलन

## ९ ऑगस्टपासून बेमुदत आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

विविध प्रलंबित मागण्यांसाठी एसटी कर्मचारी ९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर जाणार आहेत. याबाबत शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी अमरावती विभागातील कर्मचाऱ्यांनी घंटानाद आंदोलन केले. अमरावतीच्या मध्यवर्ती बसस्थानकाच्या येथील हनुमान मंदिरात कर्मचाऱ्यांनी घंटानाद करून शासनाने मागण्यांकडे लक्ष देण्याचा इशारा दिला.

सोमवारी एसटीचे कर्मचारी दुपारी एकत्र आले. सर्वप्रथम हनुमान चालिसा पठण करण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांनी हनुमान मंदिरात महाआरती केली त्यानंतर शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी घंटानाद करण्यात आला. राज्य परिवहन महामंडळाचे कर्मचाऱ्यांनी २०२१ मध्ये ५४ दिवस संप केला होता. राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे सुविधा देण्याची मागणी एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांनी केली होती. त्यावेळी हे



प्रकरण उच्च न्यायालयातही गेले होते. राज्य सरकारने मेस्माही लागू केला होता. अखेरी हा संप मिटल्यानंतर कर्मचारी पुन्हा कामावर आले. परंतु आता पुन्हा कर्मचाऱ्यांनी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे लालपरी पुन्हा ठप्प होणार की काय? अशी शंका निर्माण झाली आहे.

**या आहेत प्रमुख मागण्या**

रा.प. कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन मिळालेच पाहिजे. महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वेतनवाढीच्या दराची थकबाकी त्वरित अदा करा. रु.४८४९/- कोटींमधील उर्वरित रक्कम त्वरित अदा करा. मुळवेतनात दिलेल्या रु.५०००/-, ४०००/-, २५००/- मुळे झालेल्या विसंगती दूर करण्यासाठी सरसकट रु.५०००/- द्या. एस.टी. कर्मचारी व कुटुंबियांना कॅशलेस वैद्यकीय सुविधा (इनडोअर व आऊटडोअर) त्वरित सुरु करा. सुधारित जुल्मी शिस्त व आवेदन कार्यपद्धतीमध्ये त्वरित बदल करा. विद्यमान एस.टी. कर्मचारी व त्यांच्या कुटूबीयांना तसेच सेवानिवृतांना व त्यांच्या पत्नीस सर्व प्रकारच्या बसेसमध्ये फरक न भरता वर्षभराचा मोफत पास द्या. अश्या मागण्या महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीने राज्य शासनाकडे केलेल्या आहेत.

यावेळी मोहित देशमुख, कामगार संघटना,असलम खान, कामगार संघटना,बाळासाहेब राणे, कामगार सेना,दिनेश शेळके, कामगार सेना,राजेंद्र माहोरे, कस्ट्राईब संघटना,मोहन उके, कस्ट्राईब संघटना,शैलेश विश्वकर्मा, चचघ नौशाद बेग, जयसिंग चव्हाण, किशोर हेरोडे, राहुल रंगारी, प्रमोद फटिंग, नंदकिशोर नवाथे, अब्दुल आसिफभाई ,सचिन वडळकर, हेमंत पुनसे, ज्ञानेश्वर खोंड, मसूदखान,मिलिंद मकेश्वर, स्वप्नील तायडे, निकेश शेलोकर, गोपाल पवार,आशिष वालीवकर, हेमराज इंदूरकर, शशिकांत बंड, मनोज वंजारी, योगेश पाखरे, मोहनीश मिसाळ, दिपक बामणेल,महिला प्रतिनिधी :- चंचल आठवले, बबिता सोनुने,कु.नेवारे, सौं,औचार,कु. मोहोड,सह अनेक कर्मचारी उपस्थित होते.

# शासकीय वैद्यकिय महाविद्यालय बचाव समिती, शेतकरी व समस्त नागरीकांच्या वतीने आ.रवि राणा यांचा जाहीर नागरीक सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ बडनेरा**

आ.रवि राणा व मा.खा.नवनीत राणा यांच्या अथक प्रयत्नाने बडनेरा येथील कोडेश्वर रोड परीसरात शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय मंजुर करुन आणलेल्या बद्दल बडनेरा नागरीक शासकीय वैद्यकिय महाविद्यालय बचाव समिती, शेतकरी व समस्त नागरीकांच्यावतीने आ.रवि राणा यांचा जाहीर नागरीक सत्कार करीत राणा दाम्पत्यांचे आभार मानलेत. ४०३ कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रियेला झाली सुरुवात झाली असून लवकरच १३०० कोटी रुपयांचे भव्य दिव्य शासकिय वैद्यकिय महाविद्यालय बनुन तयार होण्याची आ.रवि राणा यांनी उपस्थित नागरीकांनी ग्वाही दिली.

गेल्या अनेक वर्षापासुन अमरावती जिल्हयातील सर्व सामान्य नागरीकांना सर्व आरोग्य सुविधा एकाच ठिकाणी घेता याव्या तसेच अमरावती जिल्हयातील व परीसरातील वैद्यकिय शिक्षण घेता यावे त्याचप्रमाणे आपातकालीन परिस्थितीमध्ये रुग्णांना नागपुर न हलवता अमरावती जिल्हयातच भव्य दिव्य असे शासकीय




वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय या ठिकाणीच त्यांचा उपचार व्हावा हा उद्देश ठेवुन माजी खासदार सौ.नवनीत राणा यांनी केंद्रीय स्तरावर तसेच आ.रवि राणा यांनी राज्य स्तरावर सातत्याने पाठपुरावा करुन अमरावती शहरातील बडनेरा मतदार संघातील कोडेश्वर रोडवरील सर्वे नं.९/१ अलीयाबाद येथील ३२ एकर जागा मंजुर करुन घेतली.

या अनमोल कार्या बद्दल बडनेरा मतदार संघाचे आ.श्री.रवि राणा यांचा बडनेरा शहरातील नागरीकांच्या वतीने त्याचप्रमाणे समस्त शेतकऱ्यांच्या वतीने भव्य नागरीक सत्काराचे आयोजन बडनेरा जुनीवस्ती येथे बारीपुरा चौक मधिल बारी पंचायत भवन या ठिकाणी करण्यात आले होते. यावेळी आ.रवि राणा यांचा भव्य दिव्य सत्कार करण्यात आला, या सत्काराला उत्तर देतांना आ.रवि राणा यांनी सांगीतले की, बडनेरा परीसरामध्ये शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय तयार होणे हे नुसते माझेच श्रेय नसुन हे आपण दिलेल्या आशिर्वादाने आपल्या सर्वाचे श्रेय असल्याचे यावेळी स्पष्ट केले. त्यामुळे लवकरच ४०३ कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रियेला सुरुवात झाली असून लवकरच १३०० कोटी रुपयांचे भव्य दिव्य शासकिय वैद्यकिय महाविद्यालय बनुन नागरीकांच्या सेवेत तयार होण्याची आ.रवि राणा यांनी उपस्थित नागरीकांनी ग्वाही दिली.

यावेळी या सत्कार सोहळयाचे अध्यक्ष श्री.डॉ.मनोजी निचत, निळकंरावजी कात्रे, डॉ.अंकुशजी नवले, किरण अंबाडकार, डॉ.वर्षाताई उमक, डॉ.अमितजी भस्मे, रमेशपंत पकडे, किशोर अंबाडकार, मोहन दरोडी, विनय घिमे, रामकृष्ण लांडोरे, नाना आमले, अजय जयस्वाल, डॉ.बारापात्रे, विजय इंगोले, गौरव बांते, शिवा निबर्ते, नितीन अंबाडकार, जनता बँकेचे श्री.राजु इंगोले, वासनकर काका, अनिल सुने, मोहन अंबाडकार, मुकेश उसरे, श्याम बडनेरकर, योगानंद जोशी, प्रविण संभे, संजय माहोरे, प्रविण दुधे, शरद उमक, विकास सुने, सुरज सुने, कैलास साबळे, कैलास रोतडे, अंकुश पकडे, राजु सुने, रमेश इंगोले, दिपक अंबाडकार, सुधिर लवणकर, संजय मुंडले, गुड्डु दुरगुडे,सिंधु मतलाने, समिक्षा गोटफोडे, रेखा संभे, विजया घोडेस्वार, रविंद्र विरुळकर, रवि दारोकार, विनोद दातीर तसेच बडनेरा शहरातील शिवाजी गणेश उत्सवमंडळाचे कार्यकर्ते त्याचप्रमाणे असंख्य नागरीक उपस्थित होते.

# अमरावतीतील पत्रकार भवन एक आदर्श वास्तू

## मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक यांचे प्रतिपादन
## विश्वस्तांचा सन्मान सोहळा, पत्रकारांशी साधला संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

पत्रकार संघटनांना एखादी वास्तू उभी करण्यापासून तिची देखभाल करण्यासाठी करावी लागणारी कसरत याची जाणीव आम्हाला आहे. राज्यात अनेक ठिकाणी पत्रकार भवन उभे झाले परंतू त्याची देखभाल व्यवस्थित न झाल्याने अडचणी निर्माण झाल्या. परंतू अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाने पत्रकार भवन, ई लायब्ररी आणि अभ्यासिका निर्माण करून अतिशय चांगल्या पद्धतीने त्याचे निर्वहन केले आहे त्यामुळे ही वास्तू संपूर्ण राज्यातील पत्रकार संघांसाठी आदर्श बनली आहे असे प्रतिपादन मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक यांनी केले आहे. मराठी पत्रकार परिषदेच्या विश्वस्तांच्या सन्मान सोहळ्याप्रसंगी त्यांनी अमरावती जिल्ह्यातील पत्रकार बांधवांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष शरद




पाबळे, महिला उपाध्यक्ष जान्हवी पाटील तसेच अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या कार्यक्रमादरम्यान तीनही विश्वस्तांचा जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना किरण नाईक यांनी सांगितले की, राज्यातील पत्रकारांवर जेव्हाही अन्याय झाला त्या प्रत्येक वेळी आम्ही त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहून त्यांना न्याय मिळवून दिला आहे. पत्रकारांमध्ये पत्रकारिता करताना कुठलेही भय राहू नये यासाठी कायदे करण्यापासून तर अन्याय करणाऱ्यांना शिक्षा होईपर्यंत पाठपुरावा आपण केला आहे. पत्रकारांना पेंशन लागू करण्यासाठी तसेच अधिस्वीकृती सहज मिळण्यासाठी देखील आपण सातत्याने प्रयत्न केले आहे. बाळशास्त्री जांभेकरांच्या स्मारकासाठी देखील मराठी पत्रकार परिषदेचेच प्रयत्न फळास आले आहेत. मराठी पत्रकार परिषद भविष्यात डिजीटल मिडियाचा विचार करता संघटनेत डिजीटल मिडियातील पत्रकारांना देखील विशेष सेल स्थापन करून सहभागी करून घेण्यासाठी विचार करते आहे. तरूणांच्या हाती पत्रकार परिषदेची धुरा देण्यासाठी चांगल्या तरूणांचा शोध देखील संघटना घेत असल्याचा विचार देखील नाईक यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सरचिटणीस प्रफुल्ल घवळे यांनी तर आभार प्रदर्शन कोषाध्यक्ष विजय ओडे यांनी केले. या कार्यक्रमाला अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे सर्व कार्यकारिणी सदस्य तसेच सभासद तसेच जिल्ह्यातील सर्व मान्यवर पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### संघटनेमुळेच राज्यात ओळख मिळाली – जान्हवी पाटील

मराठी पत्रकार परिषद ही केवळ संघटना नसून तो पत्रकारांचा परिवार आहे. संघटनेत काम करत असतानाच राज्यात अनेक ठिकाणी निरनिराळ्या पातळीवर काम करण्याची संधी प्राप्त झाली. आज जी राज्यभरात ओळख मिळाली ही मराठी पत्रकार परिषदेची देण आहे. परिषदेने पत्रकारांच्या हिताकरित लढायला आणि जीवनात खडतर प्रवासातून जगायला शिकवले. त्यामुळे मराठी पत्रकार परिषदेचा घटक असल्याचा अभिमान असल्याची भावना जान्हवी पाटील यांनी व्यक्त केली.

### अमरावतीला अधिवेशनाचा मान देण्यासाठी प्रयत्नशील – शरद पाबळे

अमरावती येथे मराठी पत्रकार परिषदेचे राज्य अधिवेशन आयोजित करण्याचा विचार संघटनेच्या विचाराधीन आहे. अद्याप त्यावर निर्णय व्हायचा असला तरीही अमरावतीला हा मान देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. अमरावती पत्रकार संघाने जे काम आजवर केले आहे ते कौतुकास्पद आहे. त्यामुळे निश्चितपणे आम्ही भविष्यात सकारात्मक विचार करून अमरावतीला संधी देऊ असे मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष शरद पाबळे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# लाडकी बहीण ऐवजी कष्ट करणाऱ्यांना पैसे द्या पैसे नसतील तर राज्यपालांचा बंगला विका

## बच्चू कडूंचा सरकारला घरचा आहेर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९सोलापुर**

राज्य सरकारने महिलांसाठी 'लाडकी बहीण योजना' सुरू केली आहे. या योजनेत महिलांना प्रत्येक महिन्याला दीड हजार रुपये मिळणार आहेत. या योजनेवरुन राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. दोन दिवसापूर्वी वित्त विभागातूनही या योजनेला विरोध असल्याची चर्चा सुरू आहेत. आता आमदार बच्चू कडू यांनीच राज्य सरकारला घरचा आहेर दिला आहे. लाडकी बहीण ऐवजी कष्ट करणाऱ्यांना पैसे द्या, यासाठी पैसे नसतील तर राज्यपाल यांच्या बंगल्याची जागा विका',असा सल्लाही आमदार बच्चू कडू यांनी दिला आहे.



दुधाला भाव द्या, कामगाराला मजुरी द्या. चालकांसाठी चांगली योजना असली पाहिजे, यासाठी पैसे नसतील मी त्यांना चांगला पर्याय देतो. त्यांनी राज्यपाल यांचा ४० एकरातील बंगला विकावा. त्याचे एक लाख कोटी रुपयांपर्यंत पैसे येतील. ते पैसे तिकडे वापरा. राज्यपाल यांना ४० एकर जागा कशाला हवी? त्यांना नवीन तीन, चार मजली इमारत बांधून द्या, असा टोलाही बच्चू कडू यांनी लगावला.

योजना आणायला काही हरकत नाही, पण त्या योजना कोणासाठी आणाव्यात हे महत्वाचं आहे. योजना कष्टकऱ्यांसाठी असायला पाहिजेत, असंही आमदार बच्चू कडू म्हणाले.देशात श्रीमंतच अधिक श्रीमंत होत चालला आहे. मुंबईत पारसींकडे महत्वाची ६ हजार एकर जमीन आहे. इंग्रजांकडून त्यांनी बक्षिस म्हणून मिळवली. कष्ट करणाऱ्यांना वन बीएचके घर भेटणे खूप मोठं झालं आहे. कष्ट करणाऱ्यांचे मूल्य जपलं पाहिजे. सरकारला आम्ही शेतकऱ्यांचा वाटा बजेटमध्ये किती आहे हे विचारत आहे. त्यांचा या बजेटमध्ये वाटाच दिसत नाही, असा आरोपही बच्चू कडू यांनी केला. सध्या मोठी विषमता सुरू आहे. ही विषमता तोडली पाहिजे. यासाठी आम्ही ९ ऑगस्टला संभाजीनगरला मोठ्या मोर्चाचे आयोजन करत आहोत, असंही आमदार कडू म्हणाले.

आम्ही विधानसभेसाठी संघटन करत आहोत, आता आमचे दोन ते तीन सदस्य आहेत. आता आम्ही २० ते २५ जागांसाठी तयारी करत आहोत. आतापर्यंत आम्हाला अनेकांचे अर्ज आले आहेत, असंही बच्चू कडू म्हणाले. काँग्रेसनेही ज्या योजना आणल्या त्याच योजना आता महायुती सुद्धा आणत आहे. आम्ही आता त्यांना मागण्यांचे पत्र देणार आहे, त्यात आम्ही १६ मुद्दे देणार आहोत. त्या योजना पूर्ण केल्या तर आम्ही निवडणुकाच लढणार नाही, महायुतीने मान्य केलं तर महायुतीला पाठिंबा देणार. महाविकास आघाडीने मान्य केलं तर त्यांना पाठिंबा देणार, असंही आमदार बच्चू कडू म्हणाले.

# डाक अदालत २० ऑगस्टला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. अमरावती**

भारतीय डाक विभागामार्फत डाक अदालतीचे आयोजन दि. २० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता मुख्य पोस्टमास्तर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबई -४००००१ कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आली आहे.


निवृतिवेतनधारकांच्या लाभाशी संबधित तक्रारी जे टपाल विभागातुन निवृत्त झाले आहेत ज्यांची संवंत असताना मृत्य झालेला आहे. टपाल विभाग, महाराष्ट्र गोवा राज्याचे निवृतिवेतनधारक ज्याचे ३ महिन्याच्या आत पूर्तता झालेली नाही. अशा प्रकरणाचा डाक पेंशन अदालत मध्ये विचार केला जाईल. निवृती वेतनधारकानी विहित नमुन्यात आपले अर्जाचे तिप्पट प्रति लेखा अधिकारी अदालत मुख्य पोस्टमास्तर जनरल, महाराष्ट्र सर्कल, न्यु एनेक्स भवन चौथा मजला मुंबई -४००००१ या पत्यावर ३१ जुलै पर्यंत पाठवावे. मुदतीनंतर आलेल्या तक्रारीचे निवारण पेंशन अदालतीमध्ये विचारात केल्या जाणार नाही.

# सततच्या पावसामुळे छत्री,रेनकोटच्या मागणीत वाढ

## पावसाने मिळवून दिला हंगामी व्यवसाय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

सततच्या पावसामुळे जिल्ह्यातील हवामानात बदल झाला आहे. रिमझिम व रिपरिप पावसामुळे लोक वैतागले आहेत. अशातच पावसापासून बचाव करण्यासाठी लोक छत्री, रेनकोटची खरेदी करीत आहेत. पूर्वी स्टॉल, दुकान, मॉल्समध्ये मिळणारे चांगल्या क्वालिटीचे रेनकोट व छत्र्या आता लहान-सहान दुकानांत विक्री होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



दरम्यान, कमी गुंतवणूक व चांगला नफा यामुळे अनेक छोट्या व्यावसायिकांनी आता रेनकोट, छत्री विक्रीचा व्यवसाय निवडला आहे. पावसाच्या पाण्यापासून बचाव करण्याकरिता लागणाऱ्या साहित्यांचे स्टॉल शहरातील बाजारपेठेत दिसूनयेत आहेत. या स्टॉल व दुकानांत रेनकोट, छत्री आणि पावसाळी टोपी खरेदीसाठी नागरिकांची गर्दी वाढू लागली आहे. संततधार पावसामुळे शाळकरी मुलांसह पालकांनी खरेदीसाठी गर्दी केल्याने बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. तर सोबतच लहान व्यापारीही खूश आहेत.

### असे आहेत दर

लहान मुले, महिला व पुरुषांसाठी बाजारात विविध प्रकारचे व कंपन्यांचे रेनकोट उपलब्ध आहेत. तर विविध प्रकारच्या छत्र्याही आल्या आहेत. रेनकोटला जास्त पसंती दिली जात असून, २०० रुपयांपासून हजार रुपयांवर रेनकोट आहेत. छत्र्यांचेही आकार व प्रिंटनुसार दर आहेत.

### छत्रीपेक्षा रेनकोटला पसंती

फिटिंगमध्ये बसणारा रेनकोट युवकांना पसंत आहे. तरुण मंडळींसाठी वॉटरप्रिट, ट्रान्स्परंट, चेन, मिड टॉप, लॉंग टॉप आदी प्रकारात रेनकोट उपलब्ध आहेत. पॅट-शर्ट, पॅराशूट, नायलॉन आदी प्रकारही दाखल आहेत.

अम्ब्रेला, लाँग कोट, टॉप विथ स्कर्ट आदींना तरुणाई पसंती देत आहे. रंगीबेरंगी आणि तंतोतंत बसणाऱ्या फॅन्सी व टिकाऊ रेनकोटला पालकांची पसंती आहे.